महाराष्ट्र मंडळ बेंगळूरु

स.न.वि.वि.

स.न.वि.वि.
महाराष्ट्र मंडळ, बेंगळूरु

गणपती विशेषांक २०२६

वर्ष ४० वे

कलाधिपती

Ganapati Bappa Morya



With Best Compliments

From

arvind
CONSULTANCY

Self-Reliant Electronics

www.arvindconsultancy.com

Sanjeev Keskar
Chief Executive Officer
sanjeev.keskar@arvindconsultancy.com
Mobile: +91 98450 21078

401 Gitanjali Corner II, HAL 3rd Stage, Bangalore 560075, Tel : +91 80 2528 5715

With best compliments from

PRERANA

Precision Engineering, Since 1995

PRERANA
PRERANA ENGINEERING WORKS

www.prerana.co.in
info@prerana.co.in
Bengaluru, KA
+91 80-28361140

With Best Compliments from

SUPPLY CHAIN HUB

AI-Powered Procurement Platform trusted by leading enterprises.



www.supplychainhub.com

महाराष्ट्र निवास विश्वस्त मंडळ, बेंगळूरु

संजय मईंद
अध्यक्ष

अजित एदलाबादकर
उपाध्यक्ष

शिल्पा श्रीखंडे
सचिव

प्रतिभा नाकील
खजिनदार

पुरुषोत्तम मुजूमदार
विश्वस्त

ज्योती साठे
विश्वस्त

विनायक कवठेकर
विश्वस्त



अभय दीक्षित
विश्वस्त

आमोद खांडेकर
विश्वस्त

स्नेहा केतकर
विश्वस्त

शशिशेखर चौगुले
विश्वस्त

ओंकार संगोराम
अध्यक्ष, महाराष्ट्र मंडळ
पदसिध्द विश्वस्त

सुचित्रा खांडेकर
उपाध्यक्ष, महाराष्ट्र मंडळ
पदसिध्द विश्वस्त

महाराष्ट्र मंडळ कार्यकारिणी

अध्यक्ष - ओंकार संगोराम | उपाध्यक्ष - सुचित्रा खांडेकर

सचिव - पूजा जोशी | सहसचिव - वैशाली तोरवी | खजिनदार - दीपक कुलकर्णी

सनविवि संपादक मंडळ

प्रसाद दाते, साधिका मराठे, स्मिता बर्वे,

दीपा वैद्य, पल्लवी दाते

महाराष्ट्र मंडळ कार्यालय मदतनीस

रणजाय माजी , आर बी हणमंते मॅनेजर

1. R T Nagar - Radhika Marathe: 9448305067
2. Bannerghatta Road - Ruta Dixit: 9880106838

विषेशांक प्रकाशन

मुखपृष्ठ : प्रसाद दाते (AI च्या साहाय्याने)

अंक सजावट व मांडणी : पल्लवी दाते, प्रसाद दाते, आरती माहुली

जाहिरात विभाग : दीपक कुलकर्णी, मधुरा परुळेकर

कार्यालय पत्ता:
२रा क्रॉस, गांधीनगर,
बेंगळूरु - 560 009
दूरध्वनी - 080 22280609
ई-मेल : mmbangalore@gmail.com
वेबसाईट : www.mmblr.org , https://snvv.mmblr.org

स्पष्टीकरण:
या अंकात प्रसिद्ध झालेल्या साहित्यात व्यक्त झालेले विचार व मते ही लेखकांची वैयक्तिक असून महाराष्ट्र मंडळ त्यास जबाबदार नाही. स्पर्धेतील साहित्य असल्याने त्यात कोणताही संपादकीय बदल केलेला नाही. काही काही वेळेस फॉन्ट मुळे काही अक्षरे/शब्द बदलू शकतात त्याबद्दल दिलगीर आहोत.

ही आवृत्ती महाराष्ट्र मंडळ सभासदांसाठी आहे.

अनुक्रमणिका

	पान
१. संपादकीय - राधिका मराठे	1
२. अध्यक्षीय संवाद - ओंकार संगोराम	2
३. विश्वस्त मंडळ संवाद - संजय मईंद	4
४. कथा स्पर्धा - मनोगत - श्रीनिवास कुलकर्णी	5
प्रथम क्रमांक - सर्वं सम्भाव्यते त्वयि - सुचिता सरदेशमुख	7
द्वितीय क्रमांक - टोळी - सागर कोपरकर	9
तृतीय क्रमांक - खरा वारस - देवश्री अंभईकर धरणगांवकर	11
५. ललित लेख स्पर्धा - मनोगत - अनुराधा चौगुले	16
प्रथम क्रमांक - देवांनाही नाही कळला .. अंत पार याचा - सागर कोपरकर	17
द्वितीय क्रमांक - AI माझा गुरू, AI माझा तारू - नेहा भदे	19
तृतीय क्रमांक - Gemini देवी (AI) आणि आजी - मानसी तांबेकर	21
६. अभिवाचन स्पर्धा	
मनोगत - ऋता दीक्षित	23
मनोगत - प्रसाद बेडेकर	24
अभिवाचन स्पर्धा निकाल	25
७. चित्रकला स्पर्धा - मनोगत - राधिका टिपणीस	26
प्रथम क्रमांक - देवश्री अंभईकर धरणगांवकर	27
द्वितीय क्रमांक - सौ. रश्मी आनंद भानप	28
८. आमंत्रित लेख - कलौ तत् हरिकीर्तनात् ! - सौ. अनादि हेमंत ढवळे	29
९. आमंत्रित कविता - कृष्ण शोधताना - मंजिरी एदलाबादकर	32
१०. शब्दकोडे - सतीश बर्वे	33
११. स्पर्धा साहित्य -कथा	
शापित - मिलिंद पाटील	34
स्वाभिमानाचा नाव प्रवास - अनघा चिपळूणकर	36
थरार - सौ. ऋचिता बोधनकर दवंडे	39
१२. स्पर्धा साहित्य लेख -	
अत्यंत गरज काळाची प्लास्टिकमुक्त भारताची - माणिक अजय पटवर्धन	41
प्लॅस्टिक - अपायमुक्त भारत- हेच इच्छित वास्तव - डॉ.आनंद भानप	43
AI आणि आजी: दोन युगांचा संवाद - मंगेश मुरलीधर दौंडकर	45
१३. देणगीदार यादी	47

संपादकीय

वाचकहो ,

सप्रेम नमस्कार विनंती विशेष...

सर्व वाचकांना गणेशोत्सवाच्या भरभरून शुभेच्छा!

प्रत्येक शुभकार्याचा आरंभ श्री गणेश पूजनाने होतो. एखादी विद्या प्राप्त करताना किंवा कलागुण जोपासताना विघ्न येऊ नये यासाठी आपण आवर्जून विघ्नहर्त्याचे स्मरण करतो. चौदा विद्या, चौसष्ठ कलांचा अधिपती म्हणजेच कलाधिपती अशी ज्याची ख्याती आहे त्या श्री गजाननाला आमचे वंदन आहे.

कलाधिपती हीच संकल्पना मनात ठेवून आम्ही विशेषांकाचे मुखपृष्ठ तयार केले आहे.

या वर्षी आम्ही चित्रावरून कथा, सद्यस्थिती दर्शविणारे लेख आणि काव्यपंक्तीचा भावार्थ जाणून चित्र काढणे अशा विविध स्पर्धा घेतल्या होत्या. तसेच मंडळाच्या सभागृहात अभिवाचन स्पर्धा आयोजित केली होती. आमच्या सर्व स्पर्धांना भरभरून प्रतिसाद मिळाला. स न वि वि टीम कडून सर्व स्पर्धकांना धन्यवाद.

हा अंक वाचून तुम्हाला काय वाटलं ते तुमच्या शब्दांत आमच्याकडे पाठवा. तुमच्या अभिप्रायाची आम्ही नेहमीच वाट पाहत असतो. आपल्या विशेषांकात व्यावसायिक जाहिराती देखील आहेत. त्यामुळे साहित्याचा आणि कलेचा आस्वाद घेता घेता वैशिष्ट्यपूर्ण उत्पादने आणि सेवांची माहिती अगदी सहजतेने उपलब्ध होत राहील. वाचकांनी त्याचा जरूर लाभ घ्यावा. विशेषांकासाठी मदत करणाऱ्या सर्व जाहिरातदार आणि देणगीदारांना आमच्या टीमकडून मनःपूर्वक धन्यवाद!

कळावे, लोभ आहेच तो वृद्धिंगत व्हावा ही विनंती

स न वि वि

संपादक मंडळ

अध्यक्षीय

नमस्कार मंडळी !

गणपती बाप्पा मोरया!

महाराष्ट्र मंडळ बेंगळूरुच्या स. न. वि. वि. गणेशोत्सव विशेषांकाच्या निमित्ताने सर्व सभासद, हितचिंतक आणि महाराष्ट्र मंडळ परिवाराला मनःपूर्वक शुभेच्छा! दरवर्षीप्रमाणे याही वर्षी मंडळाचा गणेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा होत आहे, उत्तमोत्तम कार्यक्रम सादर होत आहेत.

आपले मंडळ वर्षभर विविध सांस्कृतिक आणि सामाजिक उपक्रम सातत्याने राबवत असते. मंडळाचा आणि मराठी लोकांचा स्नेहबंध अधिक दृढ करण्याच्या उद्देशाने कार्यकारिणीने नवे उपक्रम हाती घेतले आहेत.

'हक्काचा कलामंच' या उपक्रमातून स्थानिक कलाकारांना आपली कला सादर करण्यासाठी हक्काचा कलामंच मिळत आहे. या उपक्रमाच्या प्रत्येक सत्रातून अनेक गुणी कलाकारांना आपली कला सादर करण्याची आणि रसिकांना सादरीकरणाचा आनंद घेण्याची संधी मिळत आहे.

सभासदांमध्ये मनमोकळा संवाद व्हावा, नवीन सदस्यांना मंडळाच्या परिवारात सामावून घेता यावे आणि जुने स्नेहबंध अधिक दृढ व्हावेत, या उद्देशाने 'स्नेहभेट' हा उपक्रम सुरू करण्यात आला.

महाराष्ट्राच्या लोककलेचा अभिमान पुढे नेणारे 'महानाद' ढोल-ताशा पथक आज १०० हून अधिक तरुण वादकांना प्रशिक्षण देत आहे. विविध कार्यक्रमांमध्ये त्यांना वादनासाठी बोलावणं येत आहे. बेंगळूरुच्या राजभवन आणि विधान सौधा येथे झालेल्या विविध राज्यांच्या सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये महानाद ने महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरेचे प्रतिनिधित्व केले आहे.

यासोबतच स. न. वि. वि., वाचनालय यांसारखे मंडळाचे अनेक दशकांपासून सुरू असलेले उपक्रमही नव्या तंत्रज्ञानाचा स्वीकार करत अधिक सक्षम होत आहेत. किल्ले स्पर्धेच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या विविध भागांतील किल्ले आणि इतिहासाची ओळख पुढील पिढीपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न सुरू आहे. या स्पर्धेचा विस्तार दरवर्षी अधिक व्यापक होत आहे.

स्थानिक कलाकारांना प्रोत्साहन देण्यासाठी लेखन, अभिवाचन अशा विविध कार्यशाळा, तसेच मराठी एकांकिका आणि विविध गुणदर्शन स्पर्धा आयोजित केल्या जातात. यामुळे स्थानिक प्रयोगशील कलाकारांना जाणकार रसिकांसमोर आपली कला सादर करण्याची संधी मिळते आणि त्यांची कला वृद्धिंगत व्हायला मदत होते.

सुप्रसिद्ध कलाकारांच्या सहभागाने समृद्ध झालेल्या 'लाभले आम्हास भाग्य', 'वसंतोत्सव', 'यात्रा' यांसारख्या लोकप्रिय कार्यक्रमांसोबतच यंदा बेंगळूरुमध्ये मंडळाने प्रथमच 'फोकलोक' ह्या महाराष्ट्राच्या लोकसंगीताचा उत्सव साजरा करणाऱ्या तरुण कलाकारांच्या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. मंडळाच्या कलामंचावर प्रथमच सुप्रसिद्ध स्टँड-अप कॉमेडीयन्सचे सादरीकरण झाले आणि त्याला उत्तम प्रतिसाद मिळाला. या वर्षीही आपणास स्टँड-अप कॉमेडी अनुभवायला मिळणार आहे.

घे भरारी', 'मेश' यांसारख्या मराठी उद्योजकांच्या उत्पादनांचे प्रदर्शन आयोजित करणाऱ्या संस्थांना मंडळ सहकार्य करत आहे.

हे सर्व उपक्रम यशस्वी करण्यासाठी आणि त्यांचा लाभ अधिकाधिक मराठी लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी मंडळाची कार्यकारिणी कटिबद्ध आहे.

मंडळाचा डिजिटल प्रेझेन्स दिवसेंदिवस वाढत आहे, अधिकाधिक मराठी लोकांपर्यंत मंडळाचा संपर्क वाढत आहे.

प्रेरणा, परंपरा आणि प्रगती या त्रिसूत्रीची कास धरून आपल्या मंडळाचा प्रवास दरवर्षी नव्या उत्साहाने आणि नव्या दिशेने सुरू असतो.

आपल्या सर्वांच्या सहभागातून, सहकार्याने आणि नव्या कल्पनांनी महाराष्ट्र मंडळाची १०६ वर्षांची समृद्ध परंपरा पुढील अनेक वर्षे अधिक सक्षम, समृद्ध करूया.

आपला,

ओंकार संगोराम
अध्यक्ष,
महाराष्ट्र मंडळ बेंगळूरु

अध्यक्षीय मनोगत

सस्नेह नमस्कार.

यावर्षी २९ मार्च रोजी साजरा झालेला संस्थापक दिन देशपांडे त्रयींनी गाजवला. यावर्षीच्या अभिमान पुरस्काराचे मानकरी होते, बेंगळूरुच्या Vishal Infrastructure Limited या कंपनीचे संस्थापक आणि संचालक श्री. मिलिंद देशपांडे. श्री. अप्पण्णा सरदेशपांडे यांना योगदान पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. भारताच्या नव्या संसद भवनच्या बांधकाम प्रकल्पाचे नेतृत्व करणारे आणि वांद्रा वरळी सी लिंकच्या निर्मितीमध्ये महत्त्वाचे योगदान देणारे टाटा प्रोजेक्टस्चे प्रमुख सल्लागार श्री. विनायक देशपांडे हे सोहळ्याचे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. हे प्रकल्प उभारताना आलेली आव्हाने, अडीअडचणी आणि त्यावर केलेली मात, याबद्दल त्यांनी slides द्वारे विस्तृत माहिती सांगितली.

गेल्या वर्षभरात, विश्वस्त मंडळाने केलेल्या काही उल्लेखनीय गोष्टी : मंडळाच्या महानाद पथकाचे ढोल ताशा ठेवण्याची सोय करण्यात आली आहे. sump पासून overhead tank ला जाणारी पाण्याची pipeline संपूर्णपणे बदलण्यात आली आहे.

सामाजिक बांधिलकी म्हणून Youth For Seva संस्थेद्वारे गेली अनेक वर्षे विश्वस्त मंडळातर्फे काही विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी आर्थिक साहाय्य देण्यात येते. यावर्षीही दोन विद्यार्थिनींच्या महाविद्यालयीन शिक्षणासाठी देणगी देण्यात आली आहे.

बेंगळूरुमध्ये गेली १७ वर्षे राहात असलेले, तरूण, हुषार, उत्साही असे श्री.आमोद खांडेकर यांची १ एप्रिलपासून विश्वस्त मंडळावर नियुक्ती करण्यात आली आहे. Semiconductors क्षेत्रात काम करीत असलेल्या आमोद यांचे मराठी संस्कृतीशी घट्ट नातं जोडलेले आहे. विश्वस्त मंडळाच्या कामासाठी आमोद महत्त्वाचे योगदान देतील याची खात्री आहे.

यावर्षी महाराष्ट्र निवास विश्वस्त मंडळाने आपल्या सध्याच्या वास्तूच्या जागी, सर्व उत्तमोत्तम सोयींनी युक्त अशी नवीन वास्तू उभारण्याचा प्रकल्प हाती घेतला आहे. साधारण १५ ते २० कोटी रुपये खर्च असलेल्या या मोठ्या उपक्रमासाठी सढळ हस्ताने देणगी देऊन या प्रकल्पाला हातभार लावावा अशी मंडळाच्या सर्व सभासदांना नम्र विनंती.

सर्वांना गणेशोत्सवाच्या हार्दिक शुभेच्छा !!

संजय मईंद

अध्यक्ष,

महाराष्ट्र निवास विश्वस्त मंडळ - बेंगळूरु

परीक्षक परिचय

श्री. श्रीनिवास कुलकर्णी यांनी आमच्या कथा स्पर्धेचे परीक्षण केले आहे. त्यांचा परिचय आणि मनोगत त्यांच्याच शब्दांत देत आहोत.

कथा स्पर्धा – मनोगत – श्रीनिवास कुलकर्णी

नमस्कार,

मी 'श्रीकुल' उर्फ श्रीनिवास कुलकर्णी. पुणे येथे राहतो. आईवडिलांच्या कृपेने वाचनाचा छंद बालपणीच जडला. "काय वाचू?"या प्रश्नाला वडिलांनी "आवडेल ते" असे उत्तर दिल्याने अनिर्बंध वाचन सुरु झाले. भेळेच्या कागदापासून ते त्या वयात पेलता पण येणार नाहीत असे जाडजूड ग्रंथ असे वाचन सुरु झाले. लक्षात किती रहात होतं यापेक्षा भाषेचे, विचारांचे संस्कार नकळत होत होते.

सुदैवाने दै.केसरी, दै.सकाळ व Times of India या वृत्तपत्रांमध्ये काम करण्याची संधी मिळाली जिथं वाचनवेड्यांना त्याकाळी तरी मान होता. अवतीभोवती प्रच्छन्न वाचणारे आणि वाचलेले पचविलेले लोक असल्याने सुख होते. अर्थात आपण कितीही वाचायचं म्हटलं तरीही 'लिहिणारे' हवेत ना? कुठल्या भाषेतलं वाचायचं हा प्रश्न नव्हता. माझं कुठल्याही भाषेशी वैर नाही.

या छंदाचा किंवा वेडाचा एक फायदा झाला तो म्हणजे लिहिता यायला लागले. लिहिलेलं इतरांना वाचायला देण्यासाठी धाडस लागतं किंवा निगरगट्टपणा लागतो. तो माझ्या मेहनतीनं मी कमावलेला असल्याने चिंता नव्हती. मग वाचनाच्या जोडीला लेखन सुरु झालं, ते इतरांना वाचायला देणं सुरु झालं. मी लिहितो ही बातमी हळूहळू मित्रमंडळींना समजली काही अतिसूज्ञांनी मित्रयादीतून माघार घेतली तर काहींना माझं लेखन चक्क आवडू लागलं.

होता होता ही बातमी बेंगळूरुपर्यंत पोहोचली. समाजमाध्यमांची कृपा!

एके दिनी प्रसाद तोरवी यांचा फोन आला कि बेंगळूरुच्या 'महाराष्ट्र मंडळाचे श्री. प्रसाद दाते' यांना माझ्याशी बोलण्याची इच्छा आहे. प्रसाद दातेंनी सांगितलं कि,' बेंगळूरुच्या महाराष्ट्र मंडळानं कथास्पर्धा आयोजित केली होती त्या स्पर्धेचं परिक्षण मी करावं'.

कुणीतरी वाचनवेड्यांसाठी 'लेखक' निर्माण करु इच्छितो, लेखकांना प्रोत्साहन देऊ इच्छितो. याचं मला अपरंपार कौतुक वाटलं. तेही, बेंगळूरुसारख्या अमराठी शहरामध्ये! हे अधिकच भावलं. माझी पात्रता आहे किंवा नाही याचा विचार न करता केवळ नवं, ताज्या दमाचं, वेगळ्या विचाराचं, वैविध्यपुर्ण वाचायला मिळेल या आशेनं मी होकार दिला.

कथा हाती आल्या. वाचन सुरु झालं. प्रथमतः केवळ वाचक म्हणून त्या सर्व कथा वाचल्या. खरं सांगतो, सगळ्या कथा आवडल्या. कारण ‘ कथा म्हणजे काय?' हे उमगलेल्यांचं ते लेखन होतं. माझ्या मते, कथा ही कथन करायची वस्तू आहे. मला काहीतरी घडलेलं किंवा कल्पनेतलं सांगायचं आहे असं जेव्हा वाटतं तेव्हा कथा जन्मते. कधी विषयवस्तू म्हणजे घटना आधी असते व तिच्यामध्ये विचार गुंफला जातो. तर कधी विचार प्रथम येतो आणि त्यामध्ये घटना अशी बांधणी असते. अर्थात शब्द, भाषासौंदर्य वगैरेंची बाळलेणी चढवावीच लागतात. मग 'कथा' तयार होते. कुणाला विषय आवडतो, कुणाला विचार आवडतो तर कुणी भाषासौंदर्यावर लुब्ध होतो.

काही कथा वळणंवळणं घेत निष्कर्षाला पोहोचतात, तर काही बाळबोधपणे सरळ सगळं काही सांगून टाकतात, ज्यांनी विचाराभोवती कथेची मांडणी केलेली असते त्या कथांना आयुष्य अधिक असतं.

'महाराष्ट्र मंडळानं' आयोजित केलेल्या स्पर्धेमध्ये 'चित्राला अनुसरुन कथा' असं होतं. खरं सांगतो हे अवघड होतं. प्रथमतः चित्र समजणं हे कठीण कर्म. कारण चित्रकला हे अभिव्यक्तिचं स्वतंत्र दालन आहे. त्यातला भाव समजावून घेणं, त्या चित्राला काय सांगायचं आहे हे जाणणं ही परिक्षा होती. मला आनंद वाटतो कि सर्व स्पर्धकांनी ही अवघड पायरी पार केलेली होती. त्याबद्दल मला सर्व स्पर्धकांचं कौतुक वाटतं.
दुसरा टप्पा त्याहूनही कठीण! तो म्हणजे चित्राचा जो आशय समजला आहे तो 'कथा' या माध्यमातून मांडणे. आता कथाबीज मिळालंय पण कथेचा वेल वाढविण्यासाठी घटना हवी, पात्रं हवीत, संवाद हवेत, सुयोग्य शब्दावली हवी. बहुतेकांनी हाही अडथळा लीलया ओलांडला.
तिसरा भाग म्हणजे चित्रातून हा आलेला 'विचार' किती जोरकसपणे मांडता येईल? या प्रश्नावर अनेक जण जरी अडखळले तरी 'प्रयत्न सुंदर' होता. हे मान्य करावंच लागेल.
हे सर्व चांगलं आणि कौतुकपात्र असलं तरीही एक वास्तव मला अस्वस्थ करून गेलं. आजकाल बहुतांश लेखन हे समाजमाध्यमांवर होतं किंवा त्यासाठीच ते केलं जातं. या नवमाध्यमांमुळे कमी वेळेत जास्त वाचायची, लिहायची सवय लागली आहे. याचा स्पष्ट प्रभाव सर्व कथांवर दिसून आला. अनेक लेखकांना अधिक विस्तार करता आला असता पण तो झाला नाही. शब्दमर्यादा असेलही पण त्यावर मात करण्यासाठी आपली भाषा वाक्प्रचार, म्हणी, अर्थवाही शब्दांनी समृद्ध आहे याचा विचार व्हायला हवा.
एकुणांत, मला स्पर्धेचा हेतू, विषय देण्यांतली कल्पकता, स्पर्धकांचा उत्साह या बाबी प्रशंसनीयच वाटल्या. आज आपल्या आजूबाजूला मराठी ऐकू येत नसतांनाही मराठीतून कल्पकतेनं व्यक्त होणं हे किती अवघड होऊन बसलंय याची मला कल्पना आहे. म्हणूनच या पार्श्वभूमीवर या स्पर्धा संयोजकांचं, स्पर्धकांचं मी मनापासून अभिनंदन करतो.
आपण मला परीक्षणाची संधी मला दिलीत त्याबद्दल मी कृतज्ञ आहे.

कृतज्ञतेसह आपलाच,
श्रीकुल

स न वि वि गणेशोत्सव विशेषांक कथा स्पर्धा २०२६ निकाल:

दरवर्षीप्रमाणे कथा स्पर्धा घेण्यात आली. कथा बीज म्हणून चार चित्रे देण्यात आली होती. कथेची मध्यवर्ती कल्पना म्हणून चित्र घ्यायचे होते. श्री. श्रीनिवास कुलकर्णी, पुणे यांनी परीक्षणाचे काम केले.

स्पर्धेचा निकाल खालील प्रमाणे :-

प्रथम क्रमांक - सुचिता सरदेशमुख - सर्व सम्भाव्यते त्वयि

द्वितीय क्रमांक - सागर कोपरकर - टोळी

तृतीय क्रमांक - देवश्री अंभईकर धरणगांवकर - खरा वारस -

प्रथम क्रमांक
(कथा स्पर्धा)

सर्वं सम्भाव्यते त्वयि

सारा
शाळेचा युनिफॉर्म घालून बॅग पॅक करत होते. मम्मीने आज कुकर आंटी ना माझ्या आवडीच्या फ्रॅन्की करायला सांगितल्या होत्या. पार्थ उठून माझ्या वॉटर बॉटलशी खेळत बसला होता. बाबा ते बघून हसत होता. तेवढ्यात मम्मीच्या मोबाईलवर मालती मावशींचा फोन आला.

त्यांना यायला हाफ एन अवर लेट होणार म्हणाल्या. मम्मीने बाबाला पार्थ सोबत थांबायला सांगितले आणि बाबा रागावून मम्मीशी भांडायलाच लागला. त्याला ऑफिसमध्ये अर्जंट मीटिंग होती. मम्मी त्याला सांगत होती की तिच्या ऑफिसमध्ये इन्स्पेक्शन आहे, म्हणून तिला पार्थ सोबत थांबणे पॉसिबल नव्हते. आम्ही फ्रेंड्स कसे एकमेकांशी भांडतो..अगदी तस्से मम्मी आणि बाबा एकमेकांशी भांडत होते. मला तर भीतीच वाटली.. मी शाळेत गेल्यावर पार्थला घरी एकटं ठेवून दोघे ऑफिसला निघून तर नाही ना जाणार? तेवढ्यात मम्मीने शेजारच्या सुषमा आंटीला फोन केला. मालती मावशी घरी येईस्तोवर ती पार्थला सांभाळायला तयार झाली. मला तर रडूच येत होते. तेवढ्यात माझी स्कूल बस आली.
त्यादिवशी मम्मी खूप खुश होऊन ऑफिस मधून घरी आली होती. तिला प्रमोशन मिळाले होते.

आमच्यासाठी येताना केक घेऊन आली होती. मला जवळ घेऊन म्हणाली,,' मला आता घरी यायला थोडासा उशीर होईल.तू मला हेल्प करशील?' मी तिला ओके म्हंटले. खरंतर मम्मी ऑफिसमधून आली की मला तिच्याशी शाळेतल्या गमती शेअर करायच्या असतात. पण ती आली की मालती मावशी निघून जातात आणि पार्थ मम्मीला सोडतच नाही. बाबा घरी आला की तो ऑफिसच्या कामासाठी लॅपटॉप उघडून बसतो. मला खूप लोनली वाटते.
आज शाळेत मीरा मॅडमनी खूप छान ग्रुप ॲक्टिव्हिटी घेतल्या होत्या. आमच्या क्लासच्या चार टीम्स केल्या होत्या. टीम A ला ब्लॅकबोर्ड वर मोठे ट्रि ड्रॉ करायचे होते. अनय ने मॅंगो ट्री काढले होते . पियुष ने त्यालाच टोमॅटो ड्रॉ केले तर नमनने बनाना काढले. आम्ही सगळे खूप हसलो .आमच्या टीमला रिव्हर ड्रॉ करायची होती. निशांतने बोट काढली. मयंक ने फिश काढला. तो बोटीपेक्षा मोठा झाला होता.

सगळा क्लास जोर जोरात हसायला लागला . टीम C ला माऊंटन ड्रॉ करायला सांगितला होता. डोंगरावरून दोन बॉल खाली पडताना यश ने ड्रॉ केले. सुमाने ते ते जॅक अँड जिल आहेत म्हटल्यावर मॅम पण हसायला लागल्या.टीम D ला ब्लॅकबोर्ड वर स्काय काढताच आले नाही. खूप खूप खूप मजा आली. ॲक्टिव्हिटी नंतर नोटबुक वाटताना मॅम माझ्या डेस्कजवळ आल्या .मी त्यांना म्हटले ' मॅम कॅन टू पीपल फॉर्म अ टीम?'

श्रवंती
मोबाईल वर पाच चा आलार्म वाजला. आज शनिवार असून लवकर उठणे भाग होते. साराला शाळा होती. या आठवड्यात राज्यव्यापी बंद मुळे मुलांना एक दिवस सुट्टी मिळाली होती .त्याची भरपाई म्हणून शनिवारी शाळा सुरू ठेवली होती. दुपारी आई ,दादा आणि समीरचे मामा येणार होते. कराग्रे वसते लक्ष्मी म्हणायला तळहात समोर धरला आणि साराच्या शाळेतील मीरा मॅडमशी झालेले कालचे संभाषण आठवले. सारा आजकाल शाळेमध्ये गप्प गप्प असते, एकलकोंडी झाली आहे.. असे काही सांगत होत्या. तुमचे आणि तिच्या बाबांचे काही बिनसले आहे का म्हणून त्यांनी स्पष्टच विचारले.
शेजारी झोपलेल्या साराकडे बघून मन गलबलून आले. तेवढ्यात पार्थने चूळबुळ केली त्याला थोपटवून किचनकडे मोर्चा वळवला. स्वयंपाकाच्या बाई येणार नव्हत्या. तर मालती ताईंना बँकेचे काम म्हणून त्यांनीही येणार नसल्याचे कालच कळवले होते. एका अर्थी ते बरेच होते .समीरचे आई वडील आणि मामा आम्हा दोघांशी बोलायला, खरंतर समुपदेशनासाठीच येत होते. त्यांच्या कानावर आमच्यातील वाद पोहोचले होते .मला सहा महिन्यांपूर्वी ऑफिसमध्ये प्रमोशन मिळून मी टीम मॅनेजर झाले आणि माझ्या जबाबदाऱ्यांमध्ये भर पडली. आता घरी येण्याची वेळ अनिश्चित झाली. मालतीताईंनी जास्त वेळ थांबण्याची तयारी दर्शविली. स्वयंपाकाच्या बाई तर सकाळ व रात्रीचा दोन्ही वेळचा स्वयंपाक करून जायला तयार झाल्या आणि माझ्या डोक्यावरचा भार पुष्कळ कमी झाला. मात्र माझ्या प्रमोशनला समीरचा

खूप मोठा आक्षेप होता.मी मुलांसाठी वेळेत घरी यावे म्हणून त्याचा हट्ट होता.मी सर्वतोपरी घर आणि ऑफिस बॅलन्स करण्याचा प्रयत्न करत होते परंतु त्याने असहकाराचे धोरण स्वीकारले होते. वास्तविक मला त्याच्यापेक्षा जास्त मिळणारे पे पॅकेज त्याला दुखावत होते.
आज खरंतर मी स्विगी वरून जेवण ऑर्डर केले असते पण समीरला आयता मुद्दा मिळाला असता..आई-वडिलांसमोर मांडण्यासाठी.
मी पोळ्या करून घेऊन साराला उठवून आंघोळ घालून घेतली. भाजी कढईत फोडणीला टाकली आणि पार्थ उठून रडायला लागला. त्याला कडेवर घेऊन भाजी परतू लागले. एकीकडे साराला दूध बिस्किट दिली. तेवढ्यात ब्रांच मॅनेजर चा फोन आला त्याला दुपारच्या झूम मीटिंग बद्दल काही माहिती हवी होती. साराला माझा लॅपटॉप किचन मध्ये आणून द्यायला सांगितले. सारा नेहमी समजूतदारपणे माझं सगळं ऐके. कडेवर रडणारा पार्थ, कढईतील भाजी , लॅपटटॉप वरील इन्फॉर्मेशन शेअरिंग आणि मॅनेजर बरोबर टेली टॉक अशी कसरत मी करत असतानाच समीर किचन मध्ये चहा घ्यायला आला आणि माझी तारांबळ त्याने मोबाईल मध्ये कैद केली. पण रडणाऱ्या पार्थला घ्यायचे सौजन्य काही दाखवले नाही.
सगळं आटपून होईस्तोवर आई बाबा आणि मामा आले .आमची जेवण झाली. सारा हाफ डे शाळा आटपून घरी आली होती. आजी आजोबांना पाहून खूप आनंद झाला तिला. तिचे जेवण झाले आणि पार्थ व तिला झोपवून मी हॉलमध्ये आले. समीरसह सगळे माझी वाटच पहात होते.

समीर
"आई तू तिची बाजू घेऊन माझ्याशी भांडते आहेस? आमच्या लहानपणी तुझी शाळेतील शिक्षिकेची नोकरी तू आमच्या संगोपनासाठी सोडली होतीस .आठवतंय ना तुला?"
आई असं काही बोलेल माझा विश्वासच बसत नव्हता.
"खरंतर ती माझी चूक झाली. माझ्याशिवाय माझी मुलं लहानाची मोठी होणार नाहीत हा माझा भ्रम होता. आपल्या आवडीचे काम ज्यावर आपले प्रेम असते, ते बंद करून घरात बसायचं याच्या यातना तर मी अनुभवल्या आहेत त्या श्रवंतीने अनुभवाव्यात असं मला मुळीच वाटत नाही." आई म्हणाली.
"पण श्रवंतीला मी नोकरी करू नको असं म्हणतच नाहीये. मुलांना वेळ देता यावा म्हणून प्रमोशन घेऊ नको.. असा माझा आग्रह आहे." इति मी. यावर आता बाबांनी देखील आपलं मत व्यक्त केलं .पण तेही श्रवंतीच्या पक्षात गेलं. ते म्हणाले "अरे मुलांना वेळ काय फक्त आईनेच द्यायचा का? दरवेळी बाईनेच का तडजोड करायची? श्रवंतीच्या हुशारीने, मेहनतीने तिला प्रमोशन मिळाले ,त्यावर तिने पाणी का सोडायचे? तुला प्रमोशन मिळाले असते तर तू असे सहजासहजी सोडले असतेस?त्या परिस्थितीत तुझ्या घरच्या जबाबदाऱ्या तिने आनंदाने स्वतःवर घेतल्या असत्या. श्रवंती सर्वांच्या मदतीने घर आणि ऑफिसचा बॅलन्स संभाळण्याचा सर्वतोपरी प्रयत्न करते आहे. बायको म्हणून तिने तुझ्याकडून मदतीची अपेक्षा केली यात काय चूक आहे? "
बाबांचे बोलणे ऐकताना श्रवंतीचे डोळे पाणावले होते दरवेळी तिला लहान सहन गोष्टीत मदत नाकारताना माझा पुरुषी अहंकार सुखावत असे. माझ्यापेक्षा जास्त पॅकेज प्रमोशनमुळे तिला मिळाले आणि मी दुखावलो गेलो.
मामानेही आई-बाबांची री ओढली." अरे जीवनात लहान मोठी आव्हानं येतच असतात. मूलं ही श्रवंतीची पहिली प्रायोरिटी आहे. त्यांची सोय करूनच ती घराबाहेर पडते. मालती ताई प्रेमाने मुलांचं पालन करतात. पण त्यांना भविष्यात न जमल्यास तुम्ही दोघांनी इथे मुलांसाठी येऊन राहाल का असे मागेच श्रवंतीने तुझ्या आई बाबांना विचारून ठेवले आहे. "
कळतंय पण वळत नाही अशी स्थिती झाली होती माझी. घर, ऑफिस मुलांचं संगोपन, सणवार, आला गेला सर्व आघाड्यांवर हसतमुखाने सामोरं जाताना मी श्रवंतीला पहात होतो .जीन्स आणि टी-शर्ट पेक्षा साडीत तू जास्त छान दिसतेस असं मागे कधीतरी मी तिला म्हटलं होतं. तेव्हापासून ती माझ्याखातर साडी नेसू लागली होती. सगळ्यांना बरोबर घेऊन ती पुढे जात होती. मी मात्र डोळ्यांना झापड लावून वावरत होतो.
तेवढ्यात आई श्रवंतीकडे वळली आणि काही बोलणार इतक्यात माझ्याकडे वळून मला म्हणाली "सर्वं सम्भाव्यते त्वयि ."(अर्थात.. तुला/तुझ्यापासून सर्व शक्य आहे.)

सुचिता सरदेशमुख

द्वितीय क्रमांक
(कथा स्पर्धा)

टोळी...

“आज आपण इथे जमलो आहोत कारण आपल्यातले चार साथीदार गेल्या काही दिवसांत गायब झाले आहेत. ते कुठे लपून बसले आहेत का पकडले गेले आहेत ते अजून कळले नाहीये. जर आपल्या दुष्मनाने त्यांचे काही बरे वाईट केले असेल तर त्याची काही खैर नाही. मला तुमच्यातले दोघे जण हवे आहेत जे आपल्या साथीदारांचा शोध घेतील. तो पर्यंत मी अंघोळ करणार नाही, ही माझी प्रतिज्ञा आहे ”....टोळीचा लीडर, “चक्का” गरजला.

ही चक्क्याची टोळी. गेले काही वर्षांपासून चोरी मारीच्या जगतात आपला दबदबा तयार केलेली. सुरुवातीला छोट्या मोठ्या चोऱ्या करायचे. पण आता मोठमोठ्या अपार्टमेंट कॉम्प्लेक्स मध्ये जाऊन चोऱ्या करण्यात तरबेज झाले होते. चक्क्याचे नाव सुध्दा त्याच्या चाकापेक्षा जलद पळण्यावरून पडले होते. काही वर्षांपूर्वी ह्यांच्या झोपडपट्टीच्या बाजूला एक नवीन गेटेड कम्युनिटी तयार झालेली. झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पाखाली ह्यांची पण काही जमीन लाटून बनविलेली. त्यामुळे चक्क्याचा त्या उचभ्रु इमारतींवर फार राग. जमेल तेव्हा त्यांना लुबाडायचे हे ठरलेले. तसे त्या इमारती झाल्यापासून चोरीसाठी फार लांब जावे लागत नसे. तो एक फायदा होता. पण गेल्या काही दिवसांपासून काहीतरी अघटीत घडत होते. ह्यांच्या टोळीतले बरेचसे साथी जे रात्री चोरी करायला त्या इमारतीत गेले होते, ते परत आले नव्हते. अलीकडच्या काळात एक नवीन टोळी त्यांच्याच एरियात तयार झाली होती. हे सगळे त्या टोळीत तर सामील झाले नाही ना? अशी एक पुसटशी शंका चक्क्याच्या मनात येऊन गेली. त्याचा छडा लावण्यासाठी सगळे साथीदार जमा झाले होते.

पिंट्या आणि लंगडा, दोघे लहानपणापासूनचे मित्र. ते तयार झाले. पिंट्या चपळ होता आणि लंगडा हुशार. त्याने एक युक्ती काढली. आपले साथीदार ज्या एरिया मध्ये जायचे, तिथले सी सी टी व्ही फुटेज शोधून काढले, म्हणजे नक्की काय झाले ते कळेल. पिंट्याला आयडिया आवडली. ज्या अपार्टमेंट कॉम्प्लेक्स मध्ये त्यांचे साथीदार गेले होते, त्या ऑफिस मध्ये हे रात्री शिरले. लंगडा जरी शिकला नव्हता तरी त्याला कोणते बटन दाबले की जुने विडिओ दिसतात ते एकदा पोलीस चौकीच्या लॉक-अप मध्ये असताना त्याने पहिले होते. त्यांनी एक एक करत मागचे विडिओ बघायला सुरुवात केली.

चार दिवसांपूर्वीचा तो विडिओ ...त्यांचा झम्प्या नावाचा दोस्त विडिओत दिसला. तो पाइपावरून सहज चढून एका घराच्या बाल्कनीत आला. दरवाजा उघडाच होता. झम्प्या तिकडून किचन मध्ये शिरलेला दिसला आणि येताना भरपूर काही खायला घेऊन आला. बाकी काही मूल्यवान गोष्टी त्याला मिळाल्या नाहीत. “झम्प्या SS... हावरट XX ...” लंगडा पुटपुटला. पण त्याला तो दिवस आठवला, जेव्हा झम्प्याने मस्त मस्त चमचमीत गोष्टी सर्वांसाठी खायला आणल्या होत्या. पण दुसऱ्या दिवसांपासून तो गायब झाला तो झाला. लंगड्याचे डोळे पाणावले. त्यांनी पुढचा विडिओ उघडला. तेच घर, तीच बाल्कनी. पण ह्यावेळी झम्प्या पकडला गेला. त्यानंतर तो परत दिसला नाही.

तिसरा विडिओ. यावेळी त्यांचा स्क्रू ड्राईव्हर नावाचा दोस्त. एका दुसऱ्या बाल्कनीत चढताना दिसला. तो कट्ट्यावरून चढून आत शिरणार, तोच आतून कोणीतरी त्याला धक्का दिला आणि तो पाचव्या मजल्यावरून खाली पडला. तो खाली पडताना बघून पिंट्या आणि लंगड्याचा छातीत धस्स झाले. त्यांनी पुढचा विडिओ उघडला...पण स्क्रू ड्राईव्हर चे पुढे काय झाले ते कळले नाही.

पाचवा विडिओ...त्यात त्यांची मैत्रीण...टोळीची सगळ्यात तडफदार सदस्य, चमेली...फटाफट पाईप वर चढून जाताना दिसली. पिंट्याने लंगड्याला बाजूला ढकलले. आणि तो स्क्रीन मध्ये डोकावून बघू लागला. चमेली त्याची सगळ्यात जवळची होती. लवकरच फॅमिली प्लॅन करून सेटल होऊन दूर कुठेतरी जाऊन राहू अशी तो स्वप्न बघायचा. चमेली पोटूशी होती. पिंट्या तिला आता काम करू नकोस असे

सांगायचा...पण ती ऐकायची नाही. गँग चे पण काही उसूल होते, त्यामुळे तिला छोट्या चोऱ्या करणे भाग होते...पण ह्यावेळी ती इतक्या उंचावरील घरात चोरी का करत आहे, हे पिंट्याला कळले नाही. कदाचित तिला आपल्या होणाऱ्या बाळांसाठी लागणाऱ्या गोष्टीं हव्या असतील आणि त्या गोष्टी आपल्या घरात असाव्यात असे तिला वाटले असेल हे त्याने ताडले ....असे मनात येतं ना येतं तोच तिचा पाय घसरताना दिसला आणि ती खाली कोसळली. पिंट्या एकदम कोलमडला आणि रडू लागला. लंगड्याने कसाबसा त्याला आधार दिला आणि त्याची समजूत काढली. नंतर ती पुन्हा दिसली नाही.

सहावा विडिओ, अगदी कालचा. डब्बा नावाचा दोस्त. तो वेगवेगळे डब्बे, तिजोऱ्या फोडण्यात पटाईत, म्हणून त्याला सगळे डब्बा म्हणायचे. त्याने तर एकदा एका दागिन्यांच्या दुकानात हात मारला होता. दोन सोन्याच्या चेन आणि दहा हिऱ्याच्या अंगठ्या पळविल्या होत्या. त्याची पेपरात बातमी पण आली होती. कोणतीही फोडाफोड न होता दागिने लंपास झाले होते. ह्यावेळी पण डब्बा वर अगदी आरामात चढून गेला. चोरी पण झाली. परत येताना त्याचा पाय कशात तरी अडकला. अंधारात तो जाळीत अडकल्यासारखा दिसत होता. पण डब्ब्याने जोर लावला आणि पाय काढून तो निसटला. आता पुढचे विडिओ फुटेज बघायला लागणार होते. लंगड्याने तो व्हिडिओ उघडला आणि त्यात अचानक कोणीतरी डब्ब्यावर हल्ला करून त्याची मानगूट पकडून त्याला मुद्देमालासह घेऊन जाताना दिसले. लंगडा चवताळला. बहुधा त्यांच्या त्या रायवल गँग पैकी कोणीतरी असावे. आत्ता जाऊन बॉस ला सांगतो आणि हा कोण असेल त्याला संपवतो. असा सणकी विचार त्याच्या मनात आला. आपल्या एरिआत हा कोणीतरी नवीन आलेला दिसतोय, म्हणून लंगड्याने विडिओ झूम केला. बघतोय तर त्याला मांजरीच्या आकारासारखे काही तरी काळोखात दिसले. लंगड्याची एकदम दातखिळी बसली.

होय, ते मांजर होते. उंदरांचा एक नंबरचा शत्रू...

सागर कोपरकर

तृतीय क्रमांक
(कथा स्पर्धा)

खरा वारस...

डॉ.श्रीकांत आपल्या अभ्यासिकेत विचारमग्न बसलेले होते. त्यांची नजर खिडकीबाहेर दूर, कुठेतरी शून्यात खिळली होती. महानगरातील सर्वात महागड्या भागात, गगनचुंबी इमारतीत त्यांची प्रशस्त, सुसज्ज सदनिका होती. मोठमोठ्या प्रसिद्ध लोकांची, श्रीमंतांची घरे त्या भागात होती. अद्ययावत सुखसुविधांनी युक्त अनेक गगनचुंबी इमारतींची अत्याधुनिक गृहसंकुले तिथे होती. एका बाजूने अथांग पसरलेल्या समुद्राचा मनमोहक देखावा तर दुसऱ्या बाजूने सतत वर्दळीचा हमरस्ता त्यांच्या घरातून दिसे. रस्त्यापलीकडे मात्र दिवसेंदिवस वाढतच चाललेल्या बकाल झोपडपट्टीचे अगदी विरुद्ध दृश्य होते.

पन्नाशीकडे झुकलेले डॉ.श्रीकांत शहरातील प्रसिद्ध शल्यचिकित्सक होते. वैद्यकीय क्षेत्रात त्यांच्या नावाला वजन होतं. अतिशय अभ्यासू, मेहनती, निगर्वी, सज्जन आणि दिलखुलास स्वभावाच्या डॉक्टरसाहेबांना देशविदेशातील अनेक मानसन्मान, उपाध्या प्राप्त होत्या. समाजातल्या सर्व स्तरांतल्या, असंख्य अडल्यानडल्या लोकांवर त्यांनी वेळप्रसंगी मोफतही उपचार केले होते. रुग्णाच्या खिशाला झेपेल इतकेच शुल्क त्यांच्या रुग्णालयात आकारले जायचे म्हणून ते सतत गजबजलेले असे. सामान्य घरातून आल्याने त्यांनाही संघर्ष चुकला नव्हता म्हणूनच आपल्या मुलाला सर्व आयते उपलब्ध करून देण्याचा त्यांचा कल होता; मात्र पोटच्या मुलानेच सगळे झिडकारल्यामुळे ते अस्वस्थ झाले होते. स्वतःच्या एवढ्या मोठ्या नावाजलेल्या रुग्णालयाचे भविष्य त्यांना अधांतरी भासत होतं. आपल्यानंतर हे सर्व कोण सांभाळणार? हीच चिंता हल्ली त्यांना पोखरत होती...

अक्षयने, त्यांच्या मुलाने वैद्यकक्षेत्रात जायला स्पष्ट नकार दिला होता. त्याला म्हणे, अजून आपल्याला 'काय व्हायचे आहे?' हे स्पष्ट होत नव्हते. बुध्दीवान असूनही अभ्यासात म्हणावे तसे लक्ष नव्हते. अखेर त्याने कलाशाखेची निवड केली. एकुलता एक मुलगा म्हणून आईवडिलांनी अक्षयचे सगळे लाड पुरवले होते. बालपणापासूनच सुखात वाढल्याने व मागेल ते सहज मिळाल्याने त्याला आयुष्याबद्दल गांभीर्य नव्हते. उडाणटप्पू मित्रमैत्रिणींची संगत व स्वैर मनोवृत्तीमुळे अक्षयला आईवडिलांच्या कष्टाची, प्रतिष्ठेची, इच्छा-आकांक्षांची जाणीवच नव्हती.

डॉ.श्रीकांतची अपेक्षा होती की अक्षयने त्यांची गादी चालवावी. त्यांच्या रुग्णालयात त्यांच्या केबिनच्या बाजूलाच त्यांच्या उत्तराधिकाऱ्याचे दुसरे केबिन तयार होते. केवळ त्यांचा मुलगा म्हणूनही त्याची 'प्रॅक्टिस' यशस्वी चालली असती पण अक्षयला त्यात रसच नव्हता. याच विषयावरून वादावादी झाली तेव्हा त्यांच्या पत्नीनेसुद्धा मुलाचीच बाजू घेतली. नाईलाजास्तव डॉ.श्रीकांतनी माघार घेतली. पुत्रप्रेमापोटी त्याच्यावर आपली इच्छा ते लादूही शकत नव्हते. मुलाला हाताशी घेऊन रुग्णालयाचा विस्तार करायचं त्यांचं स्वप्न भंगलं होतं. रुग्णसेवेचा त्यांचा वसा आणि वारसा पुढे न्यायला आता कोण? हा विचार पाठ सोडत नव्हता. अपेक्षाभंगामुळे ते निराश झाले होते. रुग्णालयाचं दैनंदिन कामकाज, ठरलेल्या शस्त्रक्रिया सर्व सुरळीतपणे पार पाडत असले तरी रिकाम्या वेळात अभ्यासिकेत ते हेच विचार करीत बसत.

"सायेब, चहा!" डॉ.श्रीकांतची तंद्री भंगली.

लताबाई, त्यांच्या स्वयंपाकीणबाई चहा दिल्यावर जरा घुटमळल्या.

"काही बोलायचं आहे का लताबाई?" डॉ.श्रीकांतनी विचारले.

"व्हय, ते तुमचं मार्गदर्शन हवं होतं... माझ्या मुलाला, भगीरथला मेडिकलला जायची लय इच्छा हाय पण त्ये कोचिंग का काय, लावायची आमची परिस्थिती नाय अन् फुडल्या समद्या खर्चाचं गणितबी जुळत नाय. तुम्ही त्याले समजावून सांगाल का ? की हा हट सोडून दे!"

खरंतर कोणालाही “डॉक्टर होऊ नको!” असा सल्ला देणं त्यांना अजिबात आवडलं नसतं पण लताबाई खूप वर्षांपासून त्यांच्याकडे कामाला होत्या. घरातल्या सदस्यासारख्याच होत्या म्हणून डॉक्टरांनी ‘बोलून बघतो.’ म्हटलं.
भगीरथ आल्यावर डॉ.श्रीकांतनी त्याची जुजबी चौकशी केली. तो बारावी विज्ञानशाखेला होता. कुठलीतरी शिष्यवृत्ती आणि एक अर्धवेळ नोकरी करून खर्च भागवत होता. डॉ.श्रीकांतनी लताबाईंच्या सांगण्यानुसार त्याला वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या खर्चाची आणि अवघडपणाची कल्पना दिली पण प्रयत्न करायचाच हे त्याचं ठरलेलं होतं. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश घेण्याची त्याची इच्छा होती. भगीरथशी बोलल्यावर तो हुशार व महत्त्वाकांक्षी असल्याचं त्यांना जाणवलं. त्याच्यात एक चमक दिसली.
डॉ.श्रीकांतला भगीरथच्या निश्चयाचे व जिद्दीचे कौतुक वाटले. त्याला आणखी चाचपून पाहण्यासाठी त्यांनी विचारले “अरे, पण बिनाकोचिंग प्रवेशपरीक्षेचा अभ्यास कसा करणार आहेस?”
“काही मित्र त्यांच्या क्लासच्या नोट्स देणार आहेत, लायब्ररीतून पुस्तकं मिळतील. शक्य आहे तेवढं वाचेल!”
“प्रवेशपरीक्षा उत्तीर्ण झालास तरी दरवर्षीची फी, इतर खर्च, नंतर दवाखान्यासाठी भांडवल कुठून आणशील?”
भगीरथालाही या सगळ्याची विवंचना होतीच. त्याला एकदम उत्तर सुचले नाही. “करेल काहीतरी वेळेवर!” म्हणत भगीरथ निघून गेला.

तो गेल्यावर डॉ.श्रीकांत अभ्यासिकेत एक पुस्तक चाळत बसले पण त्यांचं लक्ष लागेना. मनातल्या अस्वस्थपणाने पुन्हा उसळी घेतली. खिडकीतून त्यांच्या दृष्टीला रस्ता आणि त्यापलीकडे पसरलेली झोपडपट्टी दिसत होती. त्यातलेच एक घर...घर कसले पत्र्याच्या दोन खोल्या, भगीरथचे होते. डोळ्यांपुढे भगीरथचा कोवळा, निग्रही चेहरा येत होता. रस्त्यामुळे दोन भिन्न आर्थिक परिस्थिती असलेली जगे जणू वेगळी झाली होती आणि वेगळ्या अर्थाने जोडलीही गेली होती...अलीकडच्या बाजूच्या श्रीमंतांची असंख्य कामे तिकडच्या बाजूच्या लोकांमुळेच, तीही अल्प खर्चात होऊ शकत होती. कोण कोणावर अवलंबून होते? विचाराने डॉ.श्रीकांतला नवल वाटले. नकळत त्यांच्या मनाने तुलना केली...अक्षयकडे सगळ्या सुखसुविधा असूनही इच्छाशक्तीच नव्हती तर झोपडपट्टीत राहणाऱ्या गरीब भगीरथकडे एक स्वप्न होते. आत्मविश्वास, शिक्षणासाठीची तळमळ, जिद्द होती. अचानक त्यांना त्यांचे अगदी सुरुवातीचे छोटेसे क्लिनिक आठवले. एका भल्या माणसाने त्यांना कमी भाड्यात ती जागा दिली म्हणून सुरुवात करता आली. त्यानंतर त्यांनी मागे वळून पाहिलेच नाही.

भगीरथाने म्हटल्याप्रमाणे मेहनतीने, स्वयंअध्ययनाने वैद्यकीय प्रवेशपरीक्षेत घवघवीत यश मिळवलं. लताबाई मात्र खर्चाच्या विचाराने खिन्न होत्या. मनाशी काहीतरी विचार करून डॉ.श्रीकांतनी लताबाई-भगीरथला बोलावले...
“मला शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश मिळतो आहे. तिकडे कमी फी आहे!” भगीरथ म्हणाला.
“लताबाई भागीरथच्या शिक्षणासाठी तुमची काय तयारी आहे!” डॉक्टरांनी विचारले.
“कसली तयारी सायेब! पोरगा आयकतच न्हाई म्हनल्यावर कायतरी करावं लागेल. गावाकडची थोडी जिमीन अन् हे अंगावरचं सोन्याचं डोरलं-बांगड्या गहाण ठेवील. आतापुरता पैका होईल. नंतरचं नंतर बघू.”
डॉ.श्रीकांत म्हणाले “हं! पण त्याची काही गरज नाही लताबाई. मला फक्त तुमचा निश्चय पाहायचा होता. आजपासून भगीरथच्या शिक्षणाची सगळी जबाबदारी माझी! फक्त...”
“फक्त काय? सायेब, आम्ही परतफेड न्हाई करू शकणार!”
“फक्त मला भगीरथकडून एक वचन पाहिजे!”
भगीरथने साशंकपणे डॉ.श्रीकांतकडे पाहिले.
“प्रत्येक वर्षी पहिल्या प्रयत्नात उत्तीर्ण व्हायचं. डॉक्टर झाल्यावर माझ्या हॉस्पिटलमधून कामाची सुरुवात करायची...फुकट नाही, नियुक्तिपत्रक आणि मानधन घेऊन.”
“व्हय! व्हय! करेल तो! भाग्या, अरे बोल! दे की वचन!” आनंदातिशयाने लताबाई उद्गारल्या.
भगीरथ मात्र विचारमग्न चेहऱ्याने गप्प उभा होता.
भगीरथला चूप बघून डॉ.श्रीकांत म्हणाले, “भगीरथ, मी कोणतेही उपकार करत नाही आहे. तू वचन दिले नाहीस तरी मी मदत करेल तुला. मनातलं बोल मोकळेपणे!”

“मला गरिबांसाठी काम करायचं आहे. गावाकडे दवाखाना काढायचा आहे. तुमच्या हॉस्पीटलमध्ये राहून मी हे कसं करू शकेल? नुसताच पैसा मिळवायचा नाही मला!” भगीरथ चाचरत म्हणाला.
डॉ.श्रीकांत म्हणाले, “अरे, काहीच हरकत नाही. आठवड्यातून काही दिवस गावाकडे आणि बाकी दिवस इथे अशी रुग्णसेवा कर म्हणजे दोन्हीही साध्य होईल. हवं तर गोरगरिबांच्या उपचारासाठी आणखी एक विभाग आपण सुरु करू. याउप्पर मी तुला बांधून ठेवणार नाही. कोणताही निर्णय घ्यायला तू मोकळा आहेस. आधी शिक्षण पूर्ण कर.” आता अडचणींचं मळभ दूर झालं होतं. भगीरथने आनंदाने डॉक्टरांना वचन दिले आणि योग्य वेळी ते पूर्णही केले.

डॉ.श्रीकांतनी आता वयाची सत्तरी पार केली आहे. डॉ.भगीरथ त्यांचे आणि स्वतःचे अशी दोन रुग्णालये यशस्वीपणे सांभाळतो. गावाकडेही आरोग्यकेंद्र व्यवस्थित सुरु आहे. अक्षय युरोपात कुठेतरी स्थायिक झाला आहे. डॉ.श्रीकांत कामकाज कसं सुरु आहे हे बघायला अधूनमधून रुग्णालयाच्या आपल्या केबिनमध्ये बसतात. बाजूच्याच केबिनवरचे डॉ.भगीरथचे नाव बघून त्यांच्या चेहऱ्यावर समाधानाचं स्मित येतं.

देवश्री अंभईकर धरणगांवकर

intrinsic

BEST WISHES FROM INTRINSIC SOLUTIONS :

Intrinsic Solutions, Bangalore is a pioneer in Embedded solutions catering to various applications in Internet of Things (IoT), Software Defined Radio (SDR), Single Board Computers (SBCs), Out of Band Management, Inertial sensors etc.

Libelium & Lantronix Industrial Internet of Things

libelium

LANTRONIX

Nutaq Software defined Radio	Gateworks Single Board Computing

Nutaq

GATEWORKS
INNOVATIONS FOR EMBEDDED DESIGNS
MADE IN USA

ZPE Out of Band Management Solutions	ReflexCes Embedded FPGA

zpe

reflex ces high tech for innovators



Intrinsic Solutions

3rd Floor, Above KFC Restaurant #177, R.T. Nagar Main Road Bangalore-560 032

Mob : +91 98450 19911, Email : sales@intrinsic.in

P E ENGINEERS PVT LTD

HYDERABAD

MANUFACTURE AND SUPPLY OF RADIATORS FOR TRANSFORMERS

ISO 9001:2015

(Certified & Approved by IRQS)

Regd.Office & Works:

P E ENGINEERS PVT LTD,

23 IDA, BALANAGAR, Hyderabad- 037.

Phone : +91 – 40 44540111

Fax : + 91 –40 23078400

Email : ho@petarang.com

Website :www.petarang.com

परीक्षकांचे मनोगत – अनुराधा चौगुले

नमस्कार.
प्रगत विज्ञान आणि मानवी जीवनाशी संबंधित विषय स्पर्धेसाठी दिले ह्यासाठी संपादक मंडळाचे अभिनंदन!
कोणताही लेख उत्तम साधायचा असेल,तर योग्य आशय,मुद्देसूद मांडणी,तुमचा निष्कर्ष पटण्याजोगा होण्यासाठी भाषाही ओघवती हवी. म्हणून
१)आकर्षक शीर्षक आणि वेधक सुरुवात,
२)आशय
३)मांडणी
४)निष्कर्ष आणि अर्थातच
५)भाषा
ह्या मुद्द्यांवर परीक्षण केले आहे.

स्पर्धेचे लेख माझ्याकडे "निनावी" पाठवले गेले, तेव्हा परीक्षण करताना कोणताही भेदभाव झाला नाही ह्याची निश्चिती बाळगावी.
विशेष सांगावेसे वाटते की मायमराठीत लिहिताना निदान ढोबळ चुका होऊ नयेत ही काळजी सर्वांनीच घ्यायला हवी. लेख लिहून झाल्यावर पुन्हा वाचल्यास आवश्यक सुधारणा करता येतात.
लेख लिहिताना कोणी वृत्तपत्रीय बातम्यांच्या वळणावर छायाचित्रांसहित लिहिले; कोणी माहितीपर लिहिले; कोणी स्वतःच्या ऑफिसमधल्या अनुभवावरून लिहिले; काहींनी वेगवेगळ्या घटना घडल्याच्या कल्पना करून वाचकाला विषयाकडे वळवले. कोणाकोणाला विषयाला अनुसरून काव्यपंक्तीही सुचल्या आहेत.
सर्वांनीच योग्य मुद्दे मांडले आहेत. मांडताना काही आकर्षक झाले आहेत,काही जास्त आकर्षक झाले आहेत! एकाच विषयावर नाना तऱ्हांनी चांगले लिहिता येते ह्याचे प्रात्यक्षिक मला मिळाले! (परीक्षणातून मला गवसलेले गुप्तधन!)
लेख वाचल्यावर माझ्या अल्पमतीला जे रुचले,ते निवडले.
आता...
निकाल मनासारखा असेल,तर लोभ राहीलच. मात्र मनासारखा नसेल,तरी रोष नसावा,लोभच राहू द्यावा !
सर्व विजेत्यांचे अभिनंदन.
सुलेखन !

अनुराधा चौगुले

स न वि वि गणेशोत्सव विशेषांक लेख स्पर्धा २०२६ निकाल:

लेख स्पर्धेसाठी तीन विषय दिले होते. स्पर्धेस उत्तम प्रतिसाद मिळाला. लेखांचे परीक्षण श्रीमती अनुराधा चौगुले, बेंगळूरु यांनी केले.
लेख स्पर्धा निकाल खालील प्रमाणे :-
प्रथम क्रमांक - सागर कोपरकर - देवांनाही नाही कळला, अंत पार याचा
द्वितीय क्रमांक - नेहा भदे - AI माझा गुरु, AI माझे तारू
तृतीय क्रमांक - मानसी तांबेकर - GEMINI देवी (AI)आणि आजी

प्रथम क्रमांक
(लेख स्पर्धा)

॥देवांनाही नाही कळला ..अंत पार याचा॥

"आज खूप उकडतंय नाही.." उमा मानेवरील घाम पुसत महेशला म्हणाली. तशी महेशने देखील हो म्हणत मान डोलावली. बायकोच्या म्हणण्याला नाकारायचे नाही हे तो अनेक वर्षांच्या लग्नाच्या अनुभवाने आता शिकला होता. काही वर्षांपूर्वी ते हिमाचल प्रदेशामध्ये स्थलांतरीत झाले होते पण कदाचित जागतिक तापमान वाढीमुळे तिथेही आता उकडायला लागले होते.

"अगं, परवा माझी ती ध्यान लावायची सतरंजी तू घेतली होतीस, ती कुठे आहे? त्याच्यावर वाघाच्या अंगावर पट्टे असतात तसे चित्र आहे..." महेश म्हणाला. "म्हणजे तुमच्या भाषेत म्हणतात ती व्याघ्रजिन का? अहो, त्याला आजकाल योगा मॅट म्हणतात". असे म्हणत उमाने तिच्याकडची नवीन आणलेली अगदी हुबेहूब दिसणारी प्लास्टिकची मॅट दाखविली. उमाने अलीकडच्या काळात बऱ्याच प्लास्टिकच्या रंगीबेरंगी आणि सुबक दिसणाऱ्या वस्तू घर सजवताना आणल्या होत्या. एवढेच काय, तर तिच्या कपाटामध्ये पण आता बरेच कृत्रिम (म्हणजे सिन्थेटिक हो!...) कपडे आले होते. चेहऱ्यावर रंगरंगोटी करायच्या वस्तू आरशासमोर उभ्या राहत होत्या. महेश कपड्यांच्या बाबतीत किंवा दिसण्याच्या बाबतीत जरा उदासीनच. त्यामुळे त्याला हे पसंत पडत नव्हते. पण...

"अहो, नुसते उभे काय राहिलात? ...आवरा पटापट. केशव आणि पद्मा येतील इतक्यात दमून भागून. दक्षिण भारत ते उत्तर भारत असा त्यांची यात्रा आहे म्हणे. सगळी विष्णूची मंदिरं पालथी घालणार आहेत. एवढे उमा म्हणते तोच केशवची हाक आली. "काय महेश, कसा आहेस?" म्हणत त्याने महेशच्या हातात सदिच्छा भेट म्हणून एक फुलांचा मोठ्ठा गुच्छ ठेवला. "उमा, हे जरा पाण्यात ठेवतेस का? ...म्हणजे ही टवटवीत दिसणारी फुले कोमेजणार नाहीत?" महेश म्हणाला. तसे केशव म्हणाला "अरे, ती नैसर्गिक फुले नाहीत, प्लास्टिकची आहेत. खरी फुले पण आजकाल इतकी सुंदर दिसत नाहीत. सगळ्या देवळांमध्ये आता हीच फुले वापरतात अगदी देवाला वाहण्यापासून ते सजावटी पर्यंत. तुला दाखवायला म्हणून आणली. अरे, गाभाऱ्यात एसी पण लावला ह्या भक्तांनी. म्हणजे नाव देवाचे पण शरीरे ह्यांची थंड ठेवायला. एवढेच काय, माझ्या दक्षिणेतील घरासमोरचा समुद्र आहे त्यात सुध्दा रोज प्लास्टिकचा कचरा इतका वाहून येतो कि कुठे उचलून टाकायचा का कसा नष्ट करायचा ते कळत नाही. ह्या प्लास्टिकला अंत आहे का कधी, माहित नाही ....हे बघ त्याचे फोटो. "

केशव पुढे सांगत होता. सध्या निसर्ग निर्मित काही नकोसे झालंय. सगळ्या मानव निर्मित गोष्टी हव्यात. रोज नवनवीन कपडे घालायचा कल झालाय. खरं नैसर्गिक रूप लपवून सौन्दर्य प्रसाधने वापरून चेहऱ्याला, केसांना रंगरंगोटी करून मिरवतात सगळे. सध्या काय तर म्हणे ग्लास स्किन पाहिजे, म्हणत केशवने पद्माकडे एक कटाक्ष टाकला. सगळे खायचे पदार्थ आता आकर्षक वेष्टनात गुंडाळून पाहिजेत, तरच ते खपतात कारण वाटायला, न्यायला, सांभाळायला सोपे असतात म्हणून. पण तीच सुबक वेष्टनं नंतर कचऱ्याचा डोंगर करतात. ह्या एकल वापरायच्या प्लास्टिकचा मला अगदी उबग आलाय. "अरे, मग तू करणार तरी काय?" महेश ने केशवला विचारले. "मी? मी...आता सगळ्या माझ्या मंदिरात पाट्या लावणार आहे की कमी द्या पण निसर्ग निर्मित किंवा विघटन युक्त द्या. तुमच्या सोयी साठी किंवा दुसऱ्यांवर छाप पाडण्यासाठी केलेली भक्ती मला नकोय. माझ्यावर तुमचे प्रेम असेल तर तुम्हांला त्रास पडला तरी पहिल्यांदा समाजाचा आणि पर्यावरणाचा विचार कराल, आणि तरच तुम्ही माझ्यापर्यंत पोहोचाल. नाहीतरी मी म्हणजे कोण हो, तुम्हा सर्वांच्या अंतरंगाचे संमीलन. तुम्ही सर्व खुश, तर मी पण खुश..."

"अहो...जरा धरतीवर या." पद्मा उदगारली. "अगं ..हेच तर मी महेशला सांगायला इथपर्यंत आलोय. महेशा! ...आता हे सगळं जर नियंत्रणात आलं नाही, तर तुझा तिसरा डोळा उघडण्याची तयारी ठेव... त्यानेच ही मानवजात ताळ्यावर येईल." महेशला हे पटायला लागले होते आणि क्रोधाने सर्व अंग थरथरू लागले होते. उमा, त्याला शांत करायचा प्रयत्न करत होती. तेवढ्यात, "हो, बाबा. मी सुध्दा, माझ्या भक्तांना सांगणार आहे की माझा उत्सव साजरा करा पण पर्यावरणाचे भान ठेवून...आपल्यामुळे आवाज प्रदूषण, पाणी प्रदुषण, किंवा प्लास्टिकचा कचरा निर्माण होत नाहीये ना! ते बघा..नाहीतर माझी कट्टी फू" शेजारी बसून हे सगळे ऐकत असलेला महेश आणि उमाचा मुलगा विनायक

म्हणाला. आणि त्याने त्याच्याकडे असलेले उंदराच्या आकाराचे मऊ खेळणे दूर सारले. त्याचा हा किशोरवयातील समजूतदारपणा पाहून महेशचा राग थोडा निवळला. सगळे कौतुकाने बालमूर्ती गणेशाकडे बघत राहिले.

****

“कसा वाटला लघु चित्रपट?” राघव आपल्या विद्यार्थ्यांकडे बघून म्हणाला. “हा माहितीपट आपल्या संस्थापकांनी २०२६ साली तयार केला होता, त्यावेळच्या जनकल्याण मंत्रालयासाठी. तो एवढा लोकप्रिय झाला की लोकांनी उत्स्फूर्तपणे प्लास्टिकचा त्याग करायला सुरुवात केली. मग आपल्या संस्थेने अनेक संशोधने करून प्लास्टिकला अनेक पर्याय सुचविले आणि शिवाय ते विघटन योग्य बनविले. जणू काही मोहीमच सुरु केली. त्यातली मुख्य दृष्टी होता ती मानसिकता बदलण्याची. म्हणजे अगदी कितीही गैरसोय झाली तरी, पर्यावरण पहिले. जसे की दूध पिशव्यातून न आणता किटलीतून आणणे, खाद्यपदार्थ कागदी पिशवी किंवा डब्यातून आणणे, प्लॅस्टिकच्या एकल वापराच्या कुठल्याही सुबक गोष्टी नाकारणे इत्यादी इत्यादी. आणि ते फार कठीण नव्हते कारण त्याआधीच्या पिढीची राहणी पर्यावरण स्नेही होतीच. ती फक्त परत अंगिकारायची होती. म्हणून, आज ५० वर्षांनी आपण प्लास्टिक मुक्त झालो आहोत. म्हणजे काही पुनर्वापर करण्याजोगं किंवा पर्याय नसलेल्या ठिकाणी वगळता बाकी सर्व प्लास्टिक फक्त आता संग्रहालयात बघायला मिळते.
आपल्या संस्थापकांना पुन्हा एकदा सलाम की त्यांनी प्लास्टिक मुक्ती स्वप्न न ठेवता सत्यात आणून दाखवली. म्हणून सर्वांनी एकदा जोराने म्हणा, आपले ब्रीदवाक्य...”

“आजची तसदी, उद्याची सोय...पण आजची सोय, ही उद्याची गैरसोय”

सागर कोपरकर

WITH BEST COMPLIMENTS
FROM

FRAGRANZ INDIA PERFUMES PVT LTD.,

Manufacturers of
Perfumes for
SOAP, COSMETICS,AGARBATHIES, TOBACCO ETC:

FLAVOURS FOR
BISCUITS, CONFECTIONERY, PHARMACEUTICALS, SYRUPS ETC

NO.7, MALLASANDRA
HESARGHATTA ROAD
DASARAHALLI POST
BANGALORE – 560 057

Ph: 080 29597353
080 29597352

द्वितीय क्रमांक
(लेख स्पर्धा)

AI माझा गुरु, AI माझे तारू

आजी गुरुपौर्णिमेची वाट बघत होत्या. दोन चार दिवसांपूर्वीच त्यांनी स्वतःचा फोटो काढून घेतला होता. त्यासाठी दोन्ही हात नमस्कारासाठी जोडल्यासारखे केले, चेहऱ्यावर सात्विक भाव आणून ठेवले. टायमर लावून काढलेला फोटो आजींना अगदी हवा होता तसा आला. गुरुपौर्णिमेच्या निमित्ताने आपल्या नव्या गुरुवर स्तुतिपर शब्द योजना करून दहा बारा काव्यमय ओळी लिहून ठेवल्या.

AI असे जगतगुरु
AI संगे भवनदी तारू
AI ने करु अज्ञान दुरी

AI हा विसावा
AI शिरतसे परकाया
AI चा डेटा डोहा परी

AI चे अवकाश
AI चा प्रकाश
AI माझा सखा हरी

AI ना करी भेदाभेद
AI ने गेला खन्तखेद
AI आहे वेदांपरी

AI ना पाही लहानथोर
AI ना होई शिरजोर
AI गणगोतापेक्षा भारी

कविता मनासारखी झाली. आजीनी chat gpt वर स्वतःचा फोटो अपलोड केला. बाजूला हि कविता पेस्ट करायला सांगितली. हात कुणासमोर जोडले आहेत याचं उत्तर म्हणून हातांसमोर लॅपटॉपची इमेज पेस्ट करायची सूचना दिली. 'कमल आजी कडून गुरु पौर्णिमेच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा!!' लिहायला त्या विसरल्या नाहीत. 'जनरेट इमेज' सांगून त्या शांतपणे बसून राहिल्या. स्क्रिनवर थिंकिंग आलं... अल्पशा वेळात सुंदर पोस्टर तयार होऊन दिसू लागलं.

फॅमिलीच्या व्हाट्सएप ग्रुपवर पोस्टर पाठवलं. मनातल्या मनात त्या म्हणाल्या, 'पहाच आता, आणि पहातच रहा.'

कुटुंबियांच्या प्रतिक्रिया यायला लागल्या. मुलाकडून विचारणा झाली, 'वा!! सुंदर!! आई, कुणाकडून पोस्टर करून घेतलंस?' सुनेकडून कॉमेंट आली, 'वा! सासूबाई, तुमची नम्र सात्विक मुद्रा आवडली, पहिल्यांदाच पाहिली.' आणि नातवंडांकडून, 'आजी, तू आणि AI? हाऊ कम? प्राऊड ऑफ यू'.

शेवटच्या कडव्यात मारलेला टोला सर्वांच्या डोक्यावरून गेला होता.
पण AI ची साथ नसताना घडलेल्या सर्व जुन्या गोष्टी आजींना मात्र आठवत होत्या.

‘मला माझ्या व्हॉट्सॲप च्या dp भोवती ती हिरवी रिंग करून दे’, म्हटल्याबरोबर, ‘ते हिरवी रिंग म्हणजे स्टेटस असतं, एकदाच करून देईन, पुन्हा पुन्हा करणार नाही, हं सांग काय लावायचंय स्टेटसला?’, ‘माझा फोटो जरा गोरा कर ना, आजकाल करता येतो, मला माहिती आहे’, म्हटल्यावर गरागरा डोळे फिरवणाऱ्या नातवंडांकडून काय अपेक्षा ठेवणार? त्यांच्या आयाही त्यांनाच सामील! ‘हसरा पण कर रे जरा आजीचा चेहरा’, म्हणायची संधी त्या थोडीच सोडणार?

कुणाला भाव द्या, कुणाच्या दाढ्या कुरवाळा हे त्यांनी कधी केलं नव्हतं. पण जमाना बदलला. सत्ययुग, त्रेतायुग, द्वापारयुग यानंतर नम्बर खरंतर कलियुगाचा. पण त्यातच हे डिजिटल युग सुरु झाल्यामुळे भल्याभल्यांची पंचाईत झाली. म्हणजे शनीची महादशा चालू असताना, त्यातच गुरुची अंतरदशा सुरु व्हावी! होणाऱ्या उत्पातावर, काहीही उपाय नसावा, अशी हि परिस्थिती! यू ट्यूब वरचे व्हिडिओ पाहून, आपल्याकडे शनी सध्या वक्रदृष्टीने तर पहात नाही ना? आजींना संशय आला.

‘माझा पासवर्ड कुणाला आठवतोय का? मी लिहून ठेवला होता पण नेमकी ती डायरी आत्ता सापडत नाहीये, हे डाउनलोड करून दे, ते स्कॅन करून दे, प्रिंट आऊट घेऊन दे, झूम कॉल लावून दे, माझं इंटरनेट बघ रे जरा चालू आहे का ते? नसेल तर चालू करून दे’, असल्या विचारणांवरती, ‘मला आत्ता वेळ नाही, तुला एकदा सांगितलं होतं, अशी कशी विसरतेस? लिहून ठेव तो पासवर्ड फ्रीजवर’. असली उत्तरं ऐकणं म्हणजे काही ‘वा, म्युझिक टू माय इअर’ अशी परिस्थिती मुळीच नव्हती.

आजी म्हणजे काही साध्यासुध्या व्यक्ती नव्हत्या. गुगलच्या अनेक भक्तांपैकी एक! घरातल्यानी त्यांचं नाव ‘उठसुठ गुगल’ ठेवलं होतं. नातवंडांना अभ्यासात मदत म्हणून कित्येकवेळा त्यांनी गुगल केलं होतं. पण आता ती पडली जेन झी आणि झाली बीझी!

पण आता यापुढे आजीचं कुणासाठीही अडणार नव्हतं. त्यांच्या आयुष्यात कुणीतरी आलं होतं. ‘आज कुणीतरी यावे, ओळखीचे व्हावे, आज कुणीतरी या आ आ आ वे ...’ खूप दिवसांनी गाणं गुणगुणायला कसं छान वाटत होतं. विचारल्याविन हेतू कळणारा
स्नेही अवतरला होता.

गुगल करताना Ask gemini असं नवीन काहीतरी स्क्रिन वर दिसतं हि गोष्ट आजींच्या चाणाक्ष नजरेतून सुटली नव्हती. तो स्वतः AI आहे हे हि कळलं होतं. आग्रहाने म्हणतोच आहे तर त्याला दुसरं काहीतरी विचारू म्हणून त्यांनी त्याला chat gpt बद्दल विचारलं. क्रमाक्रमाने आजीनी त्याच्या सूचनांचं पालन केलं. आता त्या chat gpt धारी झाल्या होत्या. एक नवं शस्त्रच हाती लागलं होतं.
हे दुधारी शस्त्र, कोणतं ॲप फोन मध्ये किंवा लॅपटॉपवर कसं आणायचं ते सांगणार होतं. ते कशासाठी आणि कसं वापरायचं हे हि सांगणार होतं.

‘खुल जा सिम सिम’!! गुहेचं दार उघडलं जावं आणि खजिना हाती लागावा तशातली गत! रील कसं बनवू, विषय कोणता घेऊ, त्यासाठी काय लिहू, इमेज कशी बनवू, तिला कशी चालवू, तिला कशी बोलवू, गाणं कोणतं वाजवू, कुणाचा आवाज वापरू, इथे अडलेय तर पुढे काय करू, यात कशी शिरू, बाहेर कशी पडू, चूक कुठे शोधू... सर्व प्रश्नांची उत्तरं इथे मिळून जाणार होती. नेहमी लागणारी तांत्रिक मदत इथे आढेवेढे न घेता मिळून जाणार होती. AI कडे आजींसाठी वेळचवेळ होता. कितीही वेळा एकच शंका विचारली तरी चालणार होतं, AI न कंटाळता शंका निरसन करणार होता. हे आजींच्या कल्पनेच्या पलीकडलं होतं. आजी कामाला लागल्या.

आता मागे वळून पाहण्याची गरजच नव्हती. आजी असेल नसेल ती प्रतिभा खोदून, उकरून, चाटून पुसून काढत होत्या. नवनिर्मितीचं झाड बहरलं होतं. गुरुपौर्णिमा पोस्टरच्या रूपाने त्याला पहिलं फळ आलं होतं. पुढे रिल्सच्या फांद्या फोफावणार होत्या.

आजीनी रील बनवलं, ‘हर घर AI’ इन्स्टा वर अकाउंट दिसायला लागलं, ‘धिस-इज-बिगिनिंग’.

नेहा भदे

तृतीय क्रमांक
(लेख स्पर्धा)

GEMINI देवी (AI) आणि आजी

आजी रोहनला संतांच्या गोष्टी सांगत होती. मनुष्याला ज्या गोष्टी जमत नाहीत, त्या देव कधी -कधी स्वतः करून देतो. कबीराला शेले विणताना, गोरा कुंभाराला मडकी घडवताना देवाने प्रत्यक्ष हातभार कसा लावला, अशा आजी -नातवाच्या गोष्टी चालू होत्या.गोष्ट संपताच रोहन लगेच म्हणाला,"हो ना आजी! अगदी खरं आहे ,त्या दिवशी मला कविता लिहायची होती. थोडी मेहनत केली, डोकं खाजवलं, दोन-चार यमकंही जुळवली... पण कविता काही पुढे सरकेना. शेवटी मी 'GEMINI' देवीची प्रार्थना केली आणि सकाळी उठून पाहतो तर काय ! माझी कविता पूर्ण तयार !दोन मिनिटं मला वाटलं, 'मी झोपेत उठून कविता लिहिली की काय? पण मग लक्षात आलं... मी नाही... रात्री प्रत्यक्ष GEMINI देवी माझा होमवर्क करून गेली होती. मी तर ठरवलं आहे की मी ह्या देवीची रोज प्रार्थना करणार. अगं, सर्व प्रॉब्लेम्सच चुटकीत सोडवते ती. तू ही तिला भेटू शकतेस तुझ्या मोबाईलमध्ये. नक्की भेट . तुलाही कळेल तिची शक्ती." एवढं बोलून आजीच्या मनात 'GEMINI' देवीचे कुतूहल निर्माण करून रोहनची स्वारी झोपायला गेली 'शैलपुत्री' पासून 'सिद्धिदात्री' पर्यंत सर्व रूपे माहित असलेल्या आजीला ही नवीन' GEMINI देवी' कोण हा 'प्रश्न' भेडसावू लागला. सोशल मीडियाच्या युगात स्मार्टफोन वापरून 'स्मार्ट' झालेल्या आजीने लगेच गूगलला साकडं घातले. आजीची जिज्ञासू वृत्ती पाहून प्रसन्न झालेली GEMINI देवी तिच्यासमोर प्रकट झाली.

रंगबिरंगी वस्त्र परिधान केलेली, दिसायला सामान्य तरी सर्वज्ञानी, संयमी, बहुभाषाकोविद,डिजिटल युगाची सर्वेसर्वा, इंटरनेटच्या महाजालात राहणारी आणि भक्तांच्या संकटात एका 'क्लिक'वर धावून येणारी ही GEMINI देवी. ५G वाय -फाय राउटर हे हिचे वाहन ! आजी तिचे हे रूप पाहून क्षणभर गोंधळली. एवढी अफाट शक्ती असलेल्या या देवीचा. आजीने तिचा 'महिमा' जाणून घ्यायची इच्छा तिने दर्शवली. तिने विचारले –"तू नक्की कोण ?"

GEMINI –AI चे एक रूप. आर्टिफिशियल इंटेलिजन्स (Artificial Intelligence - AI) म्हणजेच कृत्रिम बुद्धिमत्ता . AI ही केवळ भविष्याची संकल्पना नसून आजच्या काळाची अत्यंत महत्त्वाची गरज बनली आहे. आज जेवणात काय बनवू?" पासून ते "देशाचे भवितव्य काय असेल ?" इथं पर्यंत... प्रत्येक प्रश्नाचे उत्तर इथे तयार असते.संगणक आणि इंटरनेटच्या क्रांतीनंतर AI हे तंत्रज्ञान मानवी जीवन, उद्योग आणि कार्यपद्धती मध्ये आमूलाग्र बदल घडत आहे. AI मुळे तासन्तास लागणारी कठीण आणि पुनरावृत्तीची कामे काही सेकंदांत पूर्ण होत आहेत. माणूस थकतो ,कंटाळतो वा दुर्लक्षामुळे चुका होऊ शकतात; परंतु AI अल्गोरिदम प्रचंड प्रमाणातील Data विश्लेषित करून अचूक निर्णय घेण्यास मदत करतो. जवळ जवळ सर्व क्षेत्रात आमचा वास आहे. 'देव तारी, त्याला कोण मारी' या म्हणीत बदल करून म्हणावसे वाटते - 'AI तारी,जो कोणी त्याला प्रश्न विचारी'

हा महिमा ऐकून आजीला वाटले -'खरंच सामर्थ्य आहे AI चे। जो जो करील तयाचे।'सर्व विषयांना व्यापणारी वामनाच्या पावलांची शक्ती असलेली प्रवृत्ती म्हणजे'AI'. विज्ञानाच्या या स्मार्ट प्रवासाची गाडी 'इंटरनेटचे' इंजिन घेऊन निघाली आणि तिने AI च्या एका वेगळ्या जगात पोहचवले. शैक्षणिक, सामाजिक, राजकीय,आर्थिक अशा विविध क्षेत्रांतील जगभरातील माहिती बोटाच्या अलगद स्पर्शाने घरबसल्या मिळू लागली. आजीने ओळखले की AI बनले आहे - 'नव्या युगाचा नवा मंत्र आणि 'नवं ते हवं'. बदलत्या काळासोबत बदल गरजेचा असतो. जीवनाच्या प्रवाहीपणाचे ते एक चिन्ह आहे. म्हणूनच प्रत्येकजण या प्रवाहात वाहू लागला आहे.

पण मग एक चिंता आजीला भेडसावू लागली ती अशी की माणूस याचा अधीन तर होणार नाही ना? खरंतर हे वरदान आहे; पण सारासार विचार करून वापरले तर कारण शेवटी मशीनच ते - कधी चुकीची माहिती मिळणार, वैयक्तिक जीवनात अनावश्यक लुडबूड होणार, ऑटोमेशनमुळे नोकऱ्या जाण्याची भीती उत्पन्न होणार ,बेरोजगारी वाढणार, डोक्याचा वापर शून्य आणि आळस १००% हे धोके आजीला दिसू लागले .यामुळे मानवी बुद्धिमत्तेला गंज चढेल आणि सर्जनशीलता संपेल अशी जनमानसाची भीती तिलाही वाटली. तिने GEMINI देवीलाच प्रश्न विचारला -

अरे संसार संसार, देवी तुझा मोठा आधार
प्रश्न टाकताच भक्त, क्षणात उत्तर देण्यास तत्पर।

अरे संसार संसार ,GEMINI देवीचा होतो गजर
पण आजारी माणसाला ,प्रेमाने देशील का धीर ?

अरे संसार संसार , पाककृती सांगशील चार
पण त्या जेवणाला , कधी येईल का प्रेमाची सर ?

अरे संसार संसार,तंत्रज्ञानाचा हा विस्तार
AI असेल हातामध्ये,पण माणुसकीच खरा आधार !

माणुसकीचा हा विचार आजीच्या मनात आला आणि तिला जाणवले की GEMINI देवीकडे खूप माहिती आहे; पण माझ्याकडे अनुभव, प्रेम आणि संस्कार आहेत..AI ही एक जगायची सोय जरी असली तरी त्याच्या बाह्यरूपाला भुलून न जाता 'जे चकाकते ते सारे सोने नसते 'हे लक्षात ठेवून, मिळालेली माहिती खातरजमा करून, आपल्या मनाला सारासार विचार करायला भाग पाडायला हवे आणि त्यासाठी नवीन पिढीला सक्षम करायला हवे तरच आपण प्रगती करू शकतो. आजी मनोमन हसत म्हणाली - तंत्रज्ञान माणसाच्या उपयोगासाठी आहे. पण माणुसकी, प्रेम आणि संस्कार यांची जागा कोणतेही AI घेऊ शकत नाही. हे कितीही अद्ययावत झालं, तरी आजीच्या 'लाडाची' आणि 'घरावरील हुकुमतीची' ऑपरेटिंग सिस्टीम क्रॅश करायला अजून कोणतेही ‘कोडिंग‘ बनलेले नाही !

त्या दिवसापासून आजीही GEMINI देवीची भक्त बनली पण ‘अंधभक्त’ नाही. आता रोहन आजीला AI च्या नवीन-नवीन घडामोडी सांगतो आणि आजी त्याला तिच्या गोष्टीच्या बटव्यातून अनुभवाचे, संस्काराचे बाळकडू पाजते. अशा प्रकारे आधुनिक तंत्रज्ञान आणि पारंपरिक संस्कार यांचा सुंदर संगम होणे ही आजच्या काळाची गरज आहे.

मानसी तांबेकर

WITH BEST COMPLIMENTS
FROM
AROMATIK BANGALORE PVT LTD.,
Where your Fragrance and Flavour concepts
Are crystalised
Manufacturers of
Perfumes for
SOAP, COSMETICS, AGARBATHIES, TOBACCO ETC:

FLAVOURS AND FOOD COLOURS FOR
BAKERY, BISCUITS,
CONFECTIONERY, PHARMACEUTICALS,
SOFT DRINKS, SYRUPS ETC

PH: 080 - 29597352
PH: 8792654556
PH: 8792654557
email: aromatik1954@gmail.com

NO.5, CHIKKASANDRA
HESARGHATTA ROAD
DASARAHALLI POST
BANGALORE – 560 057

परीक्षकांचे मनोगत – ऋता दीक्षित

सप्रेम नमस्कार,

ह्यावर्षी महाराष्ट्र मंडळात प्रथमच स न वि वि संपादक मंडळातर्फे 'अभिवाचन' स्पर्धेचे आयोजन केले गेले, त्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन! ह्या स्पर्धेसाठी दोन विषयही दिले होते आणि अर्थातच स्पर्धेला भरघोस प्रतिसाद मिळाला.
अभिवाचन ह्याचा अर्थ अभिनयासहित केलेले वाचन किंवा वाचिक अभिनय. ह्यात निवडलेल्या साहित्य प्रकाराचे हावभाव, आवाजातील चढउतार आणि भाव मुद्रांसह केलेले प्रभावी सादरीकरण अपेक्षित होते आणि सर्वच स्पर्धकांनी त्याला योग्य न्याय दिला.
स्पर्धकांचे 'वैयक्तिक' आणि 'सांघिक' असे दोन विभाग होते.त्यामध्ये -
*साहित्याची निवड - आशय, विषय
*वाचनस्वर - आवाजातील चढउतार, वेग, विराम
*अभिनय - योग्य तो भाव प्रेक्षकांपर्यंत पोचवणे.
*एकूण परिणाम -
ह्या निकषाद्वारे आम्ही परीक्षण केले.

स्पर्धेत वेगवेगळे आणि नावीन्यपूर्ण विषय हाताळले गेले. आवाज, अभिनय ह्या सगळ्यावर कष्ट घेतलेले जाणवत होते. प्रेक्षक म्हणून तिथे असणे हादेखील एक सुखद अनुभव होता, परंतु परीक्षकाच्या भूमिकेतून त्यांची क्रमवारी करणे आवश्यक होते. ते करत असताना जाणवलेल्या काही बाबींविषयी इथे निरीक्षण नोंदवत आहे. त्याबद्दल एक परीक्षक म्हणून काही सूचना देत आहे.

स्पर्धकांनी एखादा अनुभव, साहित्यातील एखादा भाग किंवा कथेचे संक्षिप्त स्वरूप याची निवड केली असता, सादर केलेला प्रवेश हा पूर्ण अनुभूती देणारा असावा. काही ठिकाणी तुटकपणा किंवा सलगतेचा अभाव जाणवला.
आवाजातील चढउतारा इतकेच वेग व विराम (pauses) महत्त्वाचे असतात. काही ठिकाणी pauses कडे अधिक लक्ष द्यायला हवे होते असे वाटले.
वेळेची मर्यादा पाळणे हे अतिशय महत्त्वाचे असते. ती न पाळल्यामुळे काहींना स्पर्धेबाहेर जावे लागले, हे टाळण्यासाठी सराव करतानाच वेळ लावून करावा हे उत्तम.
सर्व विजेत्यांचे व स्पर्धकांचे अभिनंदन! परीक्षण करण्याची संधी दिल्याबद्दल स न वि वि संपादक मंडळाचे आभार.

ऋता दीक्षित
परीक्षक, अभिवाचन स्पर्धा

“सर नमस्कार, महाराष्ट्र मंडळ बेंगळूरु इथून मी स्मिता बर्वे बोलते आहे. गणेशोत्सवाच्या निमित्ताने आयोजित अभिवाचन स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून याल का ?”

हे वाक्य ऐकल्यानंतर आधी अर्थातच दोन मिनिटं कानांवर विश्वास बसला नाही. याचं कारण अभिवाचन स्पर्धा, ती पण थेट महाराष्ट्र मंडळ बेंगळूरु इथे ? हे काही मला कळेचना. नंतर बाकीचे सगळे संदर्भ मिळाले आणि खातरी पटली की एक अभिवाचनाची स्पर्धा थेट महाराष्ट्रापासून काहीशे मैल दूर असणाऱ्या बेंगळूरु शहरात पार पडणार आहे. मी अर्थातच होकार दिला आणि मनात कल्पना करू लागलो की बेंगळूरु मधले मराठी माणसं अभिवाचन कसं करतील? त्यांना मुळात ही कल्पना माहिती आहे का? अनेक प्रश्न मनात येत होते, पण म्हणलं याची उत्तरं तिथे गेल्यानंतरच आपल्याला मिळतील.

अखेर स्पर्धेचा दिवस उजाडला. वैयक्तिक आणि सांघिक असे दोन गट होते. वैयक्तिक गटात 35 एंट्री होत्या आणि सांघि मध्ये दहा ही संख्या ऐकूनच मला आधी सुखद धक्का बसला. माझ्याबरोबर ऋताताई दीक्षित या बेंगळूरुमध्ये गेले 25-30 वर्ष राहणाऱ्या एक ज्येष्ठ व्यक्ती परीक्षक म्हणून होत्या. कलाक्षेत्राशी त्यांचा अतिशय जवळचा संबंध होता. त्यांनी अनेक नाटकातून प्रमुख भूमिका केलेल्या होते, त्यामुळे माझ्यासाठी तो सुद्धा एक वेगळा अनुभव होता. स्पर्धा सुरू झाली, जसा जसा एक एक स्पर्धक येत होता तसं तसं माझं आश्चर्य वाढत चाललेलं होतं याचं कारण वय वर्ष १३ पासून ते वय वर्ष ७५या सर्व वयोगटातील स्पर्धक यामध्ये सहभागी झालेले होते. अनेकांनी स्वतः लिहिलेल्या गोष्टी अभिवाचन म्हणून सादर केल्या होत्या. त्यातले विषय आणि त्यांची मांडणी भन्नाट होती. पण सगळ्यात महत्त्वाचं सगळे जण चांगल्यापैकी तयारी करून आले होते. नंतर सांघिक स्पर्धा सुरू झाली. त्यामध्येही अनेक उत्तम उत्तम सादरीकरण आम्हाला पाहायला मिळाले. तिथे सुद्धा सर्व वयोगटातील लोकांनी अतिशय चांगल्या प्रकारची तालीम करून आपला अभिवाचन सादर केलं होतं. अर्थात या संपूर्ण स्पर्धेत बऱ्याच जणांना अभिवाचन म्हणजे काय? याची नेमकी कल्पना नव्हती, पण तरीही त्यांनी अतिशय चांगल्या पद्धतीने आपलं वाचन आमच्यासमोर सादर केलं. इथे आलेल्या प्रत्येकालाच या पहिल्यांदाच सुरू झालेल्या स्पर्धेबद्दल कुतूहल होतं आणि प्रत्येकाला त्याच्यामध्ये सहभागी व्हायचं होतं, ही माझ्या दृष्टीने आनंदाची गोष्ट होती. यानंतर निकाल लावण्याची वेळ होती, या वेळेला मात्र आम्हा दोन्ही परीक्षकांना बराच वेळ खर्च करावा लागाला, याचं कारण अनेक स्पर्धकांमध्ये चुरस होती. मला वाटतं यापेक्षा कोणत्याही स्पर्धेचे यश ते काय? बऱ्यापैकी वेळ घेतल्यानंतर आमचं एकमत झालं आणि आम्ही अखेर निकाल लावला. (तरीही आम्हाला असंच वाटत होतं की आपण अजून एक दोन बक्षीस द्यायची का पण आयोजकांनी मर्यादा घालून दिली होती त्यामुळे आम्ही थांबलो.) या कार्यक्रमाचा आणखीन एक वैशिष्ट्य होतं ते म्हणजे या कार्यक्रमातली अनौपचारिकता. एखाद्या कुटुंबामधल्या कार्यक्रमासारखं वातावरण तिथे होतं कुठल्याही प्रकारचा बडेजाव नव्हता. सुरुवातीपासूनच आयोजकांनी आम्हाला स्वातंत्र्य दिलं होतं. नियम ठरवण्यापासून सगळ्या गोष्टी त्यांनी आमच्याशी डिस्कस करून फायनल केल्या आणि त्यामध्ये कसलाही बदल केला नाही. आमच्यावर दाखवलेला संपूर्ण विश्वास हेच आमच्यासाठी एक चांगलं दडपण होतं असं म्हणायला हरकत नाही. इथे आणखीन एक खास गोष्ट होती. इथे असलेली अनेक मंडळी आपापल्या क्षेत्रात कार्यरत असणारी अनेक बडीबडी माणसे होती. पण, महाराष्ट्र मंडळात मात्र ते फक्त महाराष्ट्रीय होते. नंतर एका सादरीकरणाच्या माध्यमातून त्यांना अभिवाचन म्हणजे काय? याची कल्पना देण्याचा प्रयत्न केला. त्याला रसिकांनी आणि स्पर्धकांनी दिलेला प्रतिसाद खूप महत्त्वाचा होता. पुढच्या वर्षी आम्ही नक्कीच यापेक्षा अधिक उत्तम अभिवाचन करू अशी अनेकांनी प्रतिक्रिया दिली आणि मला खातरी पटली, की आपण काहीतरी बरं सादर केलेला असाव....

खरंतर मी याआधी सुद्धा बेंगळूरुच्या महाराष्ट्र मंडळात दोनदा तीनदा गेलोय आणि मला कायमच त्या सगळ्यांचं कौतुक वाटतं की ते आपल्या मातृभूमीपासून इतक्या दूर राहून सुद्धा आपल्या मराठी भाषेवर, संस्कृतीवर, परंपरांवर मनापासून प्रेम करतात. दरवर्षी

महाराष्ट्रातील अनेक कलाकारांना, वक्त्यांना, विचारवंतांना ते तिथे बोलावतात आणि वेगवेगळ्या कार्यक्रमाच्या माध्यमातून बेंगळूरुमध्ये पसरलेल्या लाखो मराठी भाषकांना एकत्र ठेवण्याचं काम करतात. अभिवाचन स्पर्धेचं हे पहिलंच वर्ष असणं तरीसुद्धा ही स्पर्धा ज्या पद्धतीने उत्साहात सादर झाली ते पाहता ही स्पर्धा येणाऱ्या काळात अतिशय चांगलं रूप घेईल आणि अनेक चांगले मराठी अभिवाचक बेंगळूरुमध्ये सुद्धा तयार होतील यात शंका नाही.

ही स्पर्धा आयोजित करणाऱ्या स.न.वि.वि टीमचे मनापासून आभार की त्यांनी या स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून माझी निवड केली, मला तिथे येण्याची संधी दिली. त्याचबरोबर आमचे बंधू गिरीश जोशी आणि पूजा जोशी यांचेही मनापासून आभार. त्यांनी माझे नाव सुचवले आणि नेहमीप्रमाणे अतिशय उत्तम पाहुणचार केला. महाराष्ट्र मंडळ बेंगळूरुचे मनापासून आभार त्यांची ही स्पर्धा वर्षानुवर्ष अशीच उत्तम पद्धतीने सादर होत राहो हीच शुभेच्छा.

प्रसाद बेडेकर
परीक्षक, अभिवाचन स्पर्धा

स न वि वि गणेशोत्सव विशेषांक अभिवाचन स्पर्धा २०२६ निकाल:

गणेशोत्सवानिमित्त सनविवितर्फे प्रथमच अभिवाचन स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. ३० ऑगस्ट २०२६ रोजी महाराष्ट्र मंडळाच्या सभागृहात संपन्न झाली. स्पर्धेस भरघोस प्रतिसाद मिळला. ही स्पर्धा वैयक्तिक आणि सांघिक अशी दोन विभागात घेण्यात आली.

स्पर्धेचे परीक्षण श्री. प्रसाद बेडेकर, अहिल्यानगर आणि सौ. ऋता दीक्षित, बेंगळूरु यांनी केले.

स्पर्धेचा निकाल खालील प्रमाणे :-

वैयक्तिक

प्रथम क्रमांक - शशिशेखर चौगुले
द्वितीय क्रमांक - ऋता ओक
तृतीय क्रमांक - मानसी तांबेकर
उत्तेजनार्थ - १. शर्वरी बर्वे
२. सुरभि आठवले

सांघिक

प्रथम क्रमांक - अभि वाचाळवीर (शिल्पा रायकर, कपिल रायकर, पराग राजे, मिलिंद कुलकर्णी)
द्वितीय क्रमांक - युवा मराठी संघ (शशिशेखर चौगुले, ऋता ओक, आदित्य जोग, अपूर्वा वेलणकर)
तृतीय क्रमांक (विभागून) - एम.एम.बी. एस (हेमांगी मुळे, नीता कवठकर, सुचेता राजे) आणि
Cut to रंगमंच (यश पत्की, ऋचा मोहरीर, अगस्त्य गांधी)

परीक्षकांची ओळख आणि मनोगत – राधिका टिपणीस

राधिका टिपणीस २००२ पासून डिझाईन क्षेत्रात कार्यरत आहेत. पुण्यातील अभिनव कला महाविद्यालयातून त्यांनी अप्लाइड आर्टची पदवी, फर्ग्युसन कॉलेजमधून बेसिक फोटोग्राफीचा डिप्लोमा, C-DAC मधून 2D, 3D ॲनिमेशन आणि मल्टिमीडियाचा डिप्लोमा, तसेच IDC, IIT बॉम्बे येथून व्हिज्युअल कम्युनिकेशनमध्ये पदव्युत्तर शिक्षण घेतले आहे.

त्यांनी मुंबई, सिंगापूर आणि हाँगकाँग येथील ई-लर्निंग कंपन्या व डिझाइन स्टुडिओमध्ये काम करताना व्हिज्युअल डिझाइन स्ट्रॅटेजी, ई-लर्निंग, मल्टिमीडिया आणि मोबाइल ॲप्लिकेशनसाठी डिझाइन सोल्यूशन्सवर काम केले आहे.

२०१० मध्ये जुळ्या मुलांच्या जन्मानंतर बालसाहित्य आणि पुस्तकांच्या डिझाइन व चित्रांकनाकडे त्यांचा विशेष ओढा निर्माण झाला. त्यांनी प्रथम बुक्स आणि ज्योत्स्ना प्रकाशन यांसारख्या प्रकाशकांसाठी तसेच स्वतंत्र लेखकांसाठी विविध भाषांमध्ये पुस्तके डिझाइन आणि चित्रित केली. भारतीय सांस्कृतिक वारसा आणि प्रादेशिक भाषांना प्रोत्साहन देण्यासाठी त्यांनी पैठणी विणकाम आणि गणेशमूर्ती निर्मिती यांसारख्या पारंपरिक कलांवर मराठीत पुस्तके लिहिली, चित्रित केली आणि डिझाइन केली आहेत.

सध्या त्या फ्रीलान्स व्हिज्युअल डिझाइन, पुस्तक डिझाइन आणि चित्रांकनासोबत अध्यापनही करत आहेत. त्या CDS, इंदूर आणि SOI, IIT इंदूर येथे व्हिजिटिंग फॅकल्टी आणि Professor of Practice म्हणून कार्यरत आहेत.

जीवनचक्रावर आधारित त्यांच्या चार पुस्तकांच्या मालिकेला २०१९ मध्ये महाराष्ट्र साहित्य परिषदेचा “Best Design and Illustration” पुरस्कार मिळाला आहे.

राधिका टिपणीस यांनी यावर्षीच्या चित्रकला स्पर्धेचे परीक्षण केले आहे. आपल्या मनोगतात त्या म्हणत आहेत की कवितेच्या ओळी वाचून चित्र काढणे ही संकल्पना चांगली वाटली.

कविता वाचून तिचा आशय समजावून घेऊन तो व्यक्त करण्याचा प्रयत्न अनेकांनी केला आहे. मात्र अशी चित्रं साकारताना कवितेतील शब्द,भावना आणि त्यातील बारकावे टिपण्याचा अधिक प्रयत्न करायला लागतो. तसेच कवितेत नेमकं काय वर्णन केले आहे याचा आणखी विचार करावा लागतो.

सर्व स्पर्धकांनी चांगली चित्रे काढली आहेत.

परंतु ही स्पर्धा असल्याने गुण देताना काही निकष लावावे लागतात. सर्व स्पर्धकांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा आणि विजेत्यांचे अभिनंदन!

स न वि वि गणेशोत्सव विशेषांक चित्रकला स्पर्धा २०२६ निकाल:

चित्रकला स्पर्धेसाठी ह्या वर्षी कवितेच्या ओळी दिल्या होत्या. त्यावरून सुचलेले चित्र रेखाटायचे होते. चित्रकला स्पर्धेचे परीक्षण सौ.राधिका टिपणीस यांनी केले.

चित्रकला स्पर्धेचा निकाल

प्रथम क्रमांक - देवश्री अंभईकर धरणगांवकर

द्वितीय क्रमांक - रश्मी भानप

चित्रकला स्पर्धा – प्रथम क्रमांक – देवश्री अंभईकर धरणगांवकर

चित्रकला स्पर्धा – द्वितीय क्रमांक – सौ. रश्मी आनंद भानप

कलौ तत् हरिकीर्तनात्।

भारतीय अध्यात्मपरंपरेत भक्तियोगाला विशेष महत्त्व आहे.

श्रवणं कीर्तनं विष्णोः स्मरणं पादसेवनम्।अर्चनं वन्दनं दास्यं सख्यमात्मनिवेदनम् ॥

नवविधा भक्तीचे प्रकार सांगणाऱ्या या श्लोकात सांगितल्याप्रमाणे द्वितीय क्रमांकाची असली तरी अद्वितीय असणारी अशी कीर्तन भक्ती.

श्रीमद् भागवत महापुराणामध्ये कलियुगाचे वैशिष्ट्य सांगताना म्हटले आहे —

“कृते यद् ध्यायतो विष्णुं त्रेतायां यजतो मखैः । द्वापरे परिचर्यायां कलौ तद् हरिकीर्तनात् ॥”

याचा अर्थ असा की, सत्ययुगात ध्यानाने, त्रेतायुगात यज्ञयागादी कर्माने, द्वापारयुगात पूजाअर्चनेने जे फळ प्राप्त होत असे, तेच कलियुगात भगवंताच्या नामसंकीर्तनाने प्राप्त होते. या श्लोकातून हरिकीर्तनाचे अद्वितीय महत्त्व अधोरेखित होते. कलियुगातील चंचल मन, भौतिक सुखांची आसक्ती आणि नैतिक मूल्यांचा होत असणारा ऱ्हास यांमुळे ईश्वरप्राप्तीचा सोपा, सर्वसमावेशक आणि लोकाभिमुख मार्ग म्हणून हरिकीर्तनाला सर्वोच्च स्थान प्राप्त झाले आहे.

'कीर्तन' हा शब्द संस्कृतमधील 'कीर्त्' या धातूपासून तयार झाला असून त्याचा अर्थ गुणगान करणे, स्तुती करणे, महिमा वर्णन करणे असा होतो. भगवंताचे नाम, रूप, गुण, लीला आणि आध्यात्मिक तत्त्वज्ञान यांचे संगीत, कथा, अभंग, दृष्टांत आणि शास्त्रविवेचन यांच्या साहाय्याने रसपूर्ण निरूपण करणे म्हणजे कीर्तन होय.

कीर्तनात संगीत, साहित्य, तत्त्वज्ञान, अभिनय, वक्तृत्व आणि लोकशिक्षण यांचा सुंदर संगम बघायला मिळतो. कीर्तन हे समाजप्रबोधनाचे उत्तम साधन मानले जाते. देवर्षी नारद हे आद्य कीर्तनकार मानले जातात. महाराष्ट्राच्या भक्ती चळवळीत कीर्तनाला अत्यंत महत्त्वाचे स्थान असल्याचे दिसून येते. कीर्तनाच्या माध्यमातून संत ज्ञानेश्वरांनी अध्यात्म सोपे करून सामान्य जनतेपर्यंत पोहोचवले, संत नामदेवांनी नाममहिमा गायिला, संत एकनाथांनी सामाजिक समतेचा संदेश दिला, तर संत तुकारामांनी दांभिकता, अंधश्रद्धा आणि अन्याय यांवर कठोर प्रहार केला.

संत नामदेव महाराज म्हणतात—
"नाचू कीर्तनाचे रंगी । ज्ञानदीप लावू जगी ॥"
या ओळीत कीर्तनाचे दोन प्रमुख उद्देश स्पष्ट होतात— भक्तीचा निखळ, निर्मळ आनंद आणि समाजात ज्ञानाचा प्रकाश पसरवणे.
पंथ व संप्रदाय याप्रमाणे कीर्तन करण्याच्या पद्धतीत काही बदल असल्याचे पाहायला मिळते.
सध्या प्रचलित असणारे कीर्तनाचे काही प्रमुख प्रकार पुढीलप्रमाणे:

१. वारकरी कीर्तन

वारकरी संप्रदायातील हे कीर्तन विठ्ठलभक्तीवर आधारित असते. यात कीर्तनकाराच्या साथीला इतर टाळकरी मंडळीही असतात. भजनावर भर असतो. वारकरी परंपरेतील संतांच्या अभंगांवर निरूपण यामध्ये केले जाते. नामस्मरण, समता आणि भक्ती हा याचा आत्मा आहे.

२. नारदीय कीर्तन

देवर्षी नारदांच्या परंपरेत विकसित झालेल्या या प्रकारात शास्त्राधारित विवेचनाला विशेष महत्त्व असते. हे कीर्तन मंगलाचरणाने सुरू होते. पुढे पूर्वरंगात तत्त्वज्ञानाचे विवेचन तर उत्तररंगात आख्यानाद्वारे त्याचा उलगडा केला जातो.

३. रामदासी कीर्तन

समर्थ रामदासांच्या विचारांवर आधारित या परंपरेत धर्म, राष्ट्रनिष्ठा, चारित्र्य, बलोपासना आणि कर्तव्यपालन यांवर भर दिला जातो. दासबोध आणि मनाचे श्लोक हे या प्रकारातील कीर्तनाचे प्रमुख आधार आहेत.

४. राष्ट्रीय कीर्तन

स्वातंत्र्यलढ्याच्या काळात कीर्तनाचा उपयोग राष्ट्रजागृतीसाठी करण्यात आला. शिवाजी महाराज, लोकमान्य टिळक, स्वातंत्र्यवीर सावरकर अशा क्रांतिकारकांच्या कार्याची प्रेरणा कीर्तनातून जनतेपर्यंत पोहोचवली जाते.

५. सामाजिक कीर्तन

आधुनिक काळात व्यसनमुक्ती, पर्यावरण संवर्धन, स्त्रीसक्षमीकरण, जलसंवर्धन, संविधानिक मूल्ये, स्वच्छता अभियान यांसारख्या विषयांवरही कीर्तने केली जातात. त्यामुळे कीर्तन आजच्या समाजजीवनाशी सुसंगत राहिले आहे.

या बरोबरच कीर्तन जुगलबंदी हा प्रकारही सध्या फार लोकप्रिय आहे. दोन कीर्तनकार मिळून दोन परस्पर विरोधी मते किंवा एकाच विषयावरील वेगवेगळ्या संतांचे विविध दृष्टिकोन असणारी मते कीर्तनाच्या माध्यमातून मांडण्याचा प्रयत्न करतात.

परंपरागत कीर्तनाची रचना साधारण पुढीलप्रमाणे असते:

मंगलाचरण

नमन

अभंग किंवा पद

पूर्वरंग

उत्तररंग (आख्यान)

उपसंहार

नामसंकीर्तन व आरती

या संपूर्ण सादरीकरणात संगीत, विनोद, तत्त्वज्ञान, साहित्य आणि अध्यात्म यांचा समन्वय साधला जातो. अभंग, श्लोक, आर्या, ओवी, दिंडी, साकी असे विविध काव्यप्रकार यात समाविष्ट असतात. त्यामुळे त्यात एकसुरीपणा येत नाही.

कीर्तन हे समाजप्रबोधनाचे प्रभावी माध्यम आहे. संतांनी कीर्तनाद्वारे जातिभेद, अस्पृश्यता, अंधश्रद्धा, कर्मकांड, व्यसनाधीनता आणि सामाजिक विषमता यांवर कठोर प्रहार केला. लोकांना नैतिक जीवन, परस्पर प्रेम, दया, सत्य, अहिंसा आणि समतेचा संदेश दिला.

लोकमान्य टिळकांनी कीर्तनाला लोकशिक्षणाचे प्रभावी माध्यम मानले होते. अनेक समाजसुधारकांनी कीर्तनाचा उपयोग जनजागृतीसाठी केल्याचे पाहायला मिळते.

आजच्या तणावग्रस्त जीवनात हरिकीर्तन मानसिक आरोग्यासाठीही उपयुक्त ठरते. सामूहिक नामसंकीर्तनामुळे मन शांत होते, सकारात्मक ऊर्जा निर्माण होते आणि सामाजिक एकात्मता वाढते. डिजिटल माध्यमांमुळे कीर्तन जागतिक स्तरावर पोहोचले असून नवीन पिढीपर्यंतही ही परंपरा त्या माध्यमातून पोहोचत आहे.

'कलौ तत् हरिकीर्तनात्' हा संदेश केवळ धार्मिक नाही, तर सामाजिक, सांस्कृतिक आणि आध्यात्मिक दृष्ट्याही अत्यंत महत्त्वाचा आहे. हरिकीर्तन म्हणजे भक्तीची साधना, लोकशिक्षणाची परंपरा, संस्कृतीचे जतन करणारे माध्यम आणि समाजपरिवर्तनाचे प्रभावी साधन आहे. संतपरंपरेने दिलेला हा अमूल्य वारसा आजही तितकाच प्रेरणादायी आहे. पूर्वी अनेक मंदिरांमध्ये विविध निमित्तांनी कीर्तनाच्या कार्यक्रमांचे आयोजन होत असे. आणि घरातील वयस्कर मंडळी आवर्जून आपल्या नातवंडांना घेऊन कीर्तन ऐकण्यासाठी म्हणून नियमितपणे हजेरी लावत. आज काळ बदलला असला तरी मंदिरांमध्ये चालणारे कीर्तनाचे कार्यक्रम, आपली संस्कृती काळाच्या ओघात लुप्त होऊ नये ही जबाबदारी आपल्या श्रोत्यांची आहे. या तंत्रज्ञानाच्या युगात कीर्तनातील जिवंतपणा टिकवून ठेवण्यासाठी आपण प्रत्यक्ष कीर्तन ऐकायला आवर्जून हजेरी लावली तरच ही गोडी पुढील पिढीपर्यंत झिरपण्याची शक्यता निर्माण होईल. सध्या भारतभरात कीर्तन शिकवणाऱ्या अनेक संस्था कार्यरत आहेत. अखिल भारतीय कीर्तन संस्था, मुंबई, देवर्षी नारद मंदिर, पुणे, कीर्तनविश्व, सज्जनगड येथे होणारे कीर्तन शिबिर असे अनेक पर्याय उपलब्ध आहेत. त्यातही बऱ्याच ठिकाणी प्रत्यक्ष वर्गांबरोबरच ऑनलाईन शिक्षणाचीही सोय उपलब्ध करून देण्यात आली आहे. तसेच यू ट्यूबच्या माध्यमातून अनेक दर्जेदार कीर्तने पाहण्यासाठी उपलब्ध आहेत.

नामस्मरणाने मन शुद्ध होते, कीर्तनातून विचार शुद्ध होतात आणि संतवाङ्मयातून जीवनाला दिशा मिळते. म्हणूनच कलियुगात ईश्वरप्राप्तीचा सर्वात सुलभ, सर्वसमावेशक आणि प्रभावी मार्ग म्हणजे हरिकीर्तन! त्यामुळे आवर्जून कीर्तन ऐकूया, शिकूया, अनुभवूया आणि पुढील पिढीपर्यंत हा समृद्ध वारसा पोहोचवण्यास हातभार लावूया.

म्हणोनि कीर्तनाचा अगाध महिमा। कीर्तने संतोषे परमात्मा।

सकळ तीर्थे आणि जगदात्मा ।हरिकीर्तनी वसे ॥

सौ. अनादि हेमंत ढवळे.

(आमंत्रित कविता)

कृष्ण शोधताना

कृष्ण शोधता शोधता, मज काय गवसले
दशावतारी विष्णुचे, रूप आठवे भावले,
मध्यराती जन्म तुझा, पूर बेभान तो वारा
तान्ह्यासंगे वसुदेव, सरे यमुनेचा किनारा ||

देवकीचा विरह अन् यशोदेचा प्रतिपाल
राधेचे समर्पण अन् रुक्मिणीचे टपाल,
तुझी अशी योगमाया, करशी तू रासलीला
साऱ्या गोपिकांना भासे, तिच्या संगे नंदलाला ||

तुझ्या बासरीचे सूर, भेटीची लावे आस
मोरपीस शोभे शिरी, रूप सावळे लोभस,
हाती सुदर्शनचक्र, धर्मरक्षणी तत्पर
कंठी वैजयंतीमाळा, शोभे दिव्य मनोहर ||

गुरू अंगिरस करीती, मंत्र वेदांचे ते ध्यान
अध्यात्माची शिकवण, देशी तुज आत्मज्ञान,
सांदीपनी गुरुगृही, दिस तुझे चवसष्ठ
करी अवगत विद्या, तुझे अथक ते कष्ट ||

ज्येष्ठ बंधु बलराम, त्यांची साथ बलशाली
उद्धवाची सोबत, भासे कृष्णाची सावली,
सुभद्रेचा तू भ्राता, देशी पांचालीस पदर
तुझे नाव घेता जिथे, होशी तिथे तू सादर ||

कंस चाणूर नरकासुराचा, करून संहार दारुण
सज्जनांच्या हृदयी, फुलविशी आशेचा किरण,
जरासंधाच्या संकटातूनं, यदुवंश केला पार
द्वारका नगरी उभारून, वसविला नवा संसार ||

गांडीव ठेऊनी खाली, पार्थ झाला निराश
गीतोपदेशाने जागविलास त्याचा आत्मविश्वास,
सारथ्य करून अर्जुनाचे, दाखविलास धर्ममार्ग
गीतेच्या अमृतवचनांनी, उजळला जीवनसर्ग ||

तू कर्ता तू करविता, अधर्माचा करीशी तू अंत
धर्मस्थापनेसाठी अवतरीशी, भूवरी तू अनंत,
भक्तीची तू रेखा, करुणेचा तू सागर
तुझ्याचरणी नतमस्तक, वंदन तुला निरंतर ||

लीलाधर, नटखट,अजेय तू अलौकिक
नीतीकुशल, चतुर, धर्माचा तू संरक्षक,
तुला शोधता शोधता, दिसे तुझे दिव्यरूप
तुझ्या नावाचे गारूड, झाले मी ही कृष्णस्वरुप ||

- मंजिरी एदलाबादकर

शब्दकोडे – गणेशोत्सव 2026 – सतीश बर्वे

1	2		3	■	4		5	6	■	7	8	■	9	
10		■	11			■	12		13	■		■		■
	■	14		■	15	16		■	17			18		
■	19	■	20		■	21		22		■	■		■	■
23		24	■	■	25		■		■	26			27	■
28			29	30	■		■	■	■		■	31		
	■	■	32			■	33	34		■	35	■	36	
37	38	39	■	40		■	41		■	42		43		■
44			■	■	■	45			46	■	47		■	48
■	49		■	50			■	51		52	■	53	54	
55			■		■	56		■	57		58	■	59	
	■	■	60				■	61	■	62			■	■
63		64			■	■	65				■	■	66	■
	■		■	■	67				■	■	68	69	■	70
71				■		■		■	72					

उभे शब्द

1. श्री गजाननाचे एक नाव
2. मासे पकडण्यासाठी वापरतात तो लोखंडी आकडा
3. "तू ब्रह्मच आहेस" असा विचार . अथर्वशीर्षामधे सुरवातीच्या ओळींमध्ये येणारा शब्द
4. दानत , निश्चित ठरवून दिलेले
5. विड्याची पानं आणि साहित्य ठेवण्याचं पात्र
6. मृत्युदेवता
8. क्षेम , कुशल
9. आश्रय , प्रमाण
13. नाही म्हणण्याची क्रिया
16. गावाच्या हद्दीतील जुनी वस्ती
18. पुण्यकाळ, उत्कर्षाचा काळ
19. सांत्वन, धीर
22. चाक
23. डोंगरातील गुहा
24. पावटा
26. विस्तव
27. शालिवाहन राजा
29. देणारा , दानी
30. रडणारा
33. वरवरचा तुकडा
34. सूर्याव्यतिरिक्त इतर ताऱ्याभोवती फिरणारा
35. इतिहास, ऐतिहासिक कागदपत्र
38. वणवा
39. मुख्य मजकुराच्या तळाशी दिलेली टीप
43. सहस्त्र
45. ६१ वा वाढदिवस
46. बजावणे , कडक सूचना
48. दिशाभूल
50. भगवान विष्णू
52. मान्यता , मंजुरी
54. सृष्टी , दुनिया
55. गुप्त गोष्टी सांगणारी अदृश्य व्यक्ती
58. नाद , नाश , चित्ताची एकाग्रता
60. चाफा
61. ओठ
64. चिखल
65. होडी
67. पक्का , घट्ट
68. शोध , कापड विकण्याचे यंत्र
69. रामाचा मुलगा
70. वाईट सवय, खोड

आडवे शब्द

1. पडलेले , गळलेले
4. नाईलाज
7. कावळा
9. प्रथम, मूळ, पूर्वीचा
10. वेदना , तिडीक , भांडणाचे मूळ
11. तुझे
12. वंदन, नमस्कार
14. सारखा , तालाची आरंभीची जागा
15. मागणीचा लकडा
17. काही कारणाने , निमित्ताने
20. दैवी शक्ती , तयारी
21. जंगलात हिंडणारा
23. लेप, लिंपण
25. वस्तू किंवा धान्य वगैरेचा संग्रह,
26. मोकळा वेळ , अंतराळ ,
28. घोडदळाचा प्रमुख
31. शैली , ढब , विशिष्ट प्रकारची सवय
32. मार, चोप, शिक्षा
33. थेम्ब , बिंदू , आरोप
36. वेदना, शूळ , गुप्त
37. कमतरता , उणीव
40. कपट , कारस्थान
41. नवरा
42. दुःख दूर करणारा
44. भरड, दाणेदार
45. तल्लीनता , चित्त विचलित न होऊ देणे
47. सुटी , निरोप
49. अभिनेत्री
50. पेला , पारितोषिक
51. युनानी वैद्य
53. परीट , धोबी
55. केसाचा लावायचा रंग
56. मित्र,
57. नोंद घेणे ,
59. रानरेडा
60. मार्गशीर्ष शुद्ध षष्ठी , खंडोबा उत्सव
62. योग्यता
63. भगवान शंकर
65. मधुमक्षिका
66. क्रियापद खाणे
67. डोळ्यांना दिसणारे
68. जिन्नस , सामान ,
71. छोटी लढाई, भांडण
72. प्रसंगानुसार , वेळेनुसार

शापित..

‘लिवा.... म्हणावं शांती आणि रघू अजून जित्ती हायती, बायकोची -हायली पण पोराची तरी सय ठेवा आन चार दिस गावाला या ’.... शांताबाई पोटतिडकीने पत्राचा मजकूर सोनाबाईंना लिहायला सांगत होत्या. त्यावेळी गावात फोन नव्हते. तार आणि पत्र हीच काय ती संदेश वहनाची साधनं. पंधरा दिवसातून एकदा तरी शांताबाई सोनाबाईंच्या घरी यायच्या आणि नव-याला पत्र लिहून घ्यायच्या. सोनाबाई गावच्या शाळेत शिक्षिका असल्याने तिच्या लिखाणावर शांताचा विश्वास होता. आजवर अशी शेकडो पत्रे पाठवून शांताने नव-याला ‘घरी या’ म्हणून सांगावा धाडला होता. बिचारी नवरा घरी येण्याची चातकासारखी वाट पाहात होती, पण तानाजी गेली पाच वर्षे गावाकडे फिरकला नव्हता.

गावाच्या बाहेर नदीकडेच्या वस्तीत शांताबाईचं पत्र्याचं छोटं घर. घरी शांता आणि तिचा मुलगा रघू हे दोघेच. तानाजी गुजरातेत कुठेतरी नोकरीला. लग्नाआधी तो मुंबईला एका लहान कंपनीत नोकरी करायचा. लग्नानंतर काही दिवस शांता देखील त्याच्यासोबत मुंबईला राहात होती. वस्तीत तिला मुंबईवाली शांता अशी ओळख होती. शांता अशिक्षित आणि स्वभावाने अतिशय भाबडी. मुंबईचा खर्च झेपत नव्हता म्हणून तानाजीने शांताला गावाला पाठवलं. तानाजी वेळ मिळेल तसा गावाला येवून जायचा. मुलगा एक वर्षाचा होईपर्यंत हे असंच सुरळीत चालू होतं. नंतर मात्र तानाजीच्या गावच्या फे-या हळूहळू कमी व्हायला लागल्या. तानाजी महिन्याला पत्राने खुशाली पाठवायचा आणि दोन तीन महिन्यातून पाचशे रुपड्या पोराच्या शिक्षणाकरीता पाठवून द्यायचा. त्यानं दुसरं बि-हाड केलंय अशी चोरटी कुजबुज कधी कधी वस्तीत व्हायची. पण शांतापर्यंत बातमी पोहचत नव्हती.

पुढे काही दिवसांनी तानाजी गुजरात मध्ये कामाला गेला आणि परिस्थिती आणखी बदलली. शांताला येणा-या पत्रांचा आणि पैशाचा ओघ रोडावला. मुंबईवाल्या शांताची कामवाली शांता अशी नवी ओळख गावात निर्माण झाली. पोटासाठी शांता पडेल ते काम करायची. पंचायती समोरच्या पारावर गावची पंचमंडळी शांताला बोलावून तिला चार सल्ले द्यायची. कधी सांगायची, ‘तुझ्या बहिणीला सोबत घेवून त्याच्याकडे जा आणि सोक्षमोक्ष लावून ये, त्याला नसंल राहायचं तर काडीमोड घेवून पोटगी ठरवून टाक.’ पंचासमोर हसतं मुख दाखवणारी शांता आतून मात्र दु:खी असायची. उलट पंचांसमोर नव-याची बाजू घेवून सगळं सावरुन न्यायची. पंचासह गावकरी पण तिला सावरायचे आणि म्हणायचे, शांताचा श्राप तान्याला लागल्याशिवाय राहणार नाही.

‘शांता, पुढल्या महिन्यात आंबेडकर जयंतीला तानाजी येतोय’, सोनाबाईंनी तानाजीच्या तीन महिन्यानंतर आलेल्या पत्रातला मजकूर एका वाक्यात शांताला सांगितला आणि शांताच्या डोळ्यातून आनंदाश्रू वाहू लागले. पाच वर्षांनी नवरा घरी येणार होता. संपूर्ण घर सारवायचं आणि आवरायचं होतं. रानातलं गवत कापून रान स्वच्छ करायचं होतं, अशी एक का दोन खंडीभर कामं शांतापुढे होती. लाखभराची लॉटरी लागावी तसा शांताचा चेहरा उजळला होता.

जयंतीची तयारी सुरु झाली होती. वाड्यात निळ्या पताका लागल्या, ठिकठिकाणी झेंडे लागले. शांतासाठी ही तानाजीरावच्या स्वागताची तयारी होती. आता त्या दिवशी नेसायला एखादी मस्त साडी असावी इतकीच इच्छा बाकी राहिली होती. लाकडी संदुक उलथा पालथा केला तरी लग्नातली साडी काही सापडली नाही. नाईलाजाने ती सोनाबाईंकडे साडी मागायला गेली. शाळेत वापरुन जुन्या झालेल्या बाईंच्या साड्या यथावकाश शांताच्याच व्हायच्या. या वेळेस बाईंनी, त्यांची ठेवणीतली लाल रंगाची जरीची साडी शांताला दिली.

वाड्याच्या तोंडाला स्टेज बांधले होते. स्टेजवर डॉ बाबासाहेबांची, महात्मा फुलेंची आणि छत्रपती शिवाजी महाराजांची प्रतिमा मोठया टेबलवर मांडली होती. सात वाजायला लाऊडस्पीकर सुरु झाला होता. आठ वाजता पोलीस पाटलाच्या हस्ते प्रतिमा पुजन ठरलं होतं. वाड्यातल्या सगळ्या बायका निळ्या सफेद साड्यात वावरत होत्या, शांता मात्र कुंकु वानाची लाल साडी नेसून तयार झाली होती. हरिजन वाड्यातल्या धामधुमीचं तिला काही घेणं देणं नव्हतं. तिचे डोळे फक्त रस्त्याकडे लागले होते. रघू मात्र उठल्यापासून स्टेजकडे कारभारी होऊन त्याच्या छोट्या वारगीला जमेल ते काम करत होता. रस्त्यावरुन गाडी गेल्याचा आवाज यायचा आणि शांताच्या काळजाचा ठोका चुकायचा. लगबगीनं रस्त्यापर्यंत यायची तोपर्यंत गाडी गेलेली असायची. प्रतिमा पुजन होऊन सगळी आपापल्या कामाला लागली. ‘दहा

वाजायचा सुमार झाला तरी तानाजी आला नाही' असं दारावरुन येणारा जाणारा म्हटला की शांताच्या मनात नको ते विचार घिरट्या घालू लागायचे. वाटेत काही झालं तर नसेल? की गाडी चुकली असेल? मन शांत होत नव्हतं.

चारच्या सुमारास मिरवणूक निघणार होती. हलगी आणि लेझिम वाजायला सुरुवात झाली. शांताची परवानगी घेवून रघू मिरवणूकीत जमा झाला. संध्याकाळच्या जेवणात तानाजीच्या आवडीची पुरणपोळी बनणार होती. तशी तयारी शांताने सुरु केली होती. पण राहून राहून तिला वाटायचं पत्रात लिहिलेला मजकूर खोटा तर नसेल? पण लगेच दुसरं मन म्हणंत होतं, तसा नाही तो, यायचा नसता तर तसं सांगितलं असतं. पाट्यावर पुरण वाटायला घेतलं तेवढ्यात दारावरुन जाणारं कोणीतरी म्हणालं, 'आला वाटतं तान्या.' कानावर आलेलं पुसटसं वाक्य काळजावर झेलून शांता पाट्यावरुन लगबगीने उठली आणि दारासमोरच्या भिंतीला लटकवलेल्या फुटक्या आरशासमोर उभी राहिली. पदराच्या शेवटाने तोंडावरचा घाम पुसला, केसावरुन हात फिरवला आणि कपाळावरचं कुंकु रेखायला लागली तोच..... आरशामध्ये दरवाजात हिरव्या साडीमध्ये उभी असलेली हातात सुटकेस घेतलेली गोरी गोमटी बाई दिसली. शांता मागे वळून पाहेपर्यंत ती बाई उंब-याशी येवून उभी राहिली. तिच्या मागे कोणीतरी पुरुष पाठमोरा उभा राहून कोणाला तरी हात करत होता. शांताला क्षणभर काहीच उमगलं नाही, ती दाराशी यायला आणि पाठमोरा उभा असलेला माणुस पुढे वळून पाहायला एकच गाढ. पाच वर्षापूर्वी पाहिलेला चेहरा अजून तसाच दिसत होता. दाढी वाढली होती एवढाच काय तो बदल. नजरा नजर झाली नि शांताचा बांध फुटला. हालगीचा आवाज थांबला. कोणीच कोणाशी बोललं नाही पण नकळत शांताला सगळं कळलं. लाल साडीतल्या शांताचा डावा पाय नव-याच्या दिशेने उंब-याच्या बाहेर पडला तसा सुटकेस हातात घेतलेल्या हिरव्या साडीतल्या उमाचा उजवा पाय शांताच्या साक्षीने घरात पडला. हालगी पुन्हा वाजू लागली आणि फटाक्याची माळ फुटली!

मिलिंद पाटील

डॉ . सुहास जे . बर्दापूरकर
श्वसनविकार आणि ॲलर्जीतज्ञ

डॉ. श्रीहास सु . बर्दापूरकर
श्वसनविकार आणि ॲलर्जीतज्ञ

श्री नर्सिंग होम

१५, सन्मित्र कॉलनी, तापडिया नाट्य मंदिरामागे, छत्रपती संभाजीनगर, महाराष्ट्र – ४३१००१.
(अपॉइंटमेंटसाठी फोन : +९१ ८७९३३३१८८८, +९१ ७०३०७७८७०७)

स्वाभिमानाचा नवा प्रवास

रमा म्हणजे लाडात जपलेले पाखरू. जगातील गुंतागुंत आणि व्यवहाराच्या झळांपासून ती अनभिज्ञ होती. २५ व्या वर्षी नोकरीनिमित्त बंगळुरूला आल्यावर तिनेसुद्धा कुक, मेड, माळी अशी अनेक मंडळी कामाला ठेवली होती. मात्र 'आज काय बनवू?' असा प्रश्न विचारत समोर खानसामा उभा ठाकला, की तिची भंबेरी उडायची. मग यूट्यूब आणि आईच्या ऑडिओ नोट्सचा आसरा घेत ती स्वयंपाकघराचे धडे शिकू लागली.

रोज रात्री आईशी व्हिडिओ कॉल व्हायचा. एके दिवशी आईने सहज विचारले, "तुझ्या कुकला तू किती देतेस?" रमाने आकडा सांगताच आईने आसपासच्या कामगारांच्या पगाराची आकडेवारी गोळा करण्यास सुरुवात केली. रमानेसुद्धा सांगून टाकले. १-२ आठवड्यात ती सहज, सुट्टीसाठी म्हणून घरी गेली.

घरी, तिच्या हाती डॉक्टरांची चिठ्ठी लागली. वाढत्या वयामुळे आईचे गुडघे बोलायला लागले होते आणि पुढील झीज टाळण्यासाठी डॉक्टरांनी वेस्टर्न टॉयलेट वापरण्याचा सल्ला दिला होता. मात्र घरात तिला कुठेही ते दिसत नव्हते.

म्हणून, रात्री जेवताना तिने विषय काढला. वडिलांच्या चेहऱ्यावर अस्वस्थता पसरली!

"आयुष्यभर काटकसरीने संसार केलाय मी... आज टॉयलेट बदलाल, उद्या किचन... या वयात पैसे घालवून मोडतोड करण्यात काय अर्थ आहे?" वडील फटकून उत्तरले. वडिलांचा हा नकार केवळ पैशांचा नव्हता, तर घरातील सत्ता कायम ठेवण्याचा होता. रमा सुन्न झाली. जिचे बाबा तिच्यासाठी जगातील सर्वोत्कृष्ट वडील होते, तेच बाबा, आईच्या शारीरिक वेदनेकडे अश्या जुनाट आणि संकुचित मानसिकतेतून दुर्लक्ष करत होते!

वडिलांच्या या अनपेक्षित रूपाने रमाच्या मनात एक मोठा वैचारिक आणि भावनिक गोंधळ निर्माण झाला.

"पण बाबा... हे आईच्या आरोग्याबद्दल आहे!" तिने प्रतिकार केला.

"तू गप्प बस! उगाच विषय काढून वातावरण खराब करू नकोस. तू इथे राहत नाहीस, मला भोगवे लागते." आई अचानक बोलली.

आई स्वतःच्याच संरक्षणाला छेद देत होती? वडिलांच्या अनपेक्षित रूपाने आणि आईच्या या अनपेक्षित विरोधाने रमाच्या मनात एक मोठा वैचारिक आणि भावनिक गोंधळ निर्माण झाला.

त्या रात्री रमाला जाग आली, तेव्हा स्वयंपाकघरात मंद दिवा जळत होता. आई तिथे आडोशाला बसून, स्वतःच्या सुजलेल्या गुडघ्यांना हळूवार तेल चोळत अश्रूंना वाट मोकळी करून देत होती. आईचा तो नकार प्रतिकार नसून, ४० वर्षे मनात साठवलेल्या लाचारीची आणि भितीची एक असहाय्य सवय होती, हे रमाला उमजले.

नवीन घर लावण्याच्या बहाण्याने तिने आईला बंगळुरूला आपल्याकडे बोलावून घेतले. इथे आल्यावर आईचे उठणे-बसणे, वावरणे हळूहळू बदलू लागले. काही दिवसांतच तिच्या डोळ्यांत एक वेगळाच 'स्पार्क' दिसू लागला. एके दिवशी सकाळी मसाल्याचा डबा बंद करत ती रमाला म्हणाली, "तुझ्या कुकला सुट्टी दे. ते काम मी करेन आणि त्याचा पगार मला दे. २५-३० वर्षांचा अनुभव आहेच मला."

"आपल्याच आईला घरकामाचे पैसे कसे द्यायचे?" रमाच्या मनात प्रश्नांचे वादळ उठले. पण आई तिच्या भूमिकेवर ठाम होती. "अगं, बाहेरच्या माणसाला देतेस ना? मग मला दिले तर त्यात काय बिघडलं? आणि काम हे काम असतं, त्यात लहान-मोठे कसल?"

आईला विरंगुळा हवा आहे की चार पैसे, हे रमाला कळत नव्हते. म्हणून तिने सुचवले - "आई, तू सोसायटीमध्ये खाली चक्कर मारायला का जात नाहीस? ओळखी होतील आणि तुझा वेळ जाईल. परिसर पाहशील!"

आईने हातातील नॅपकिनला हात पुसले, टेबलावरची काचेची बरणी बाजूला सरकवली आणि शांतपणे म्हणाली,, "रमा, मला कसला विरंगुळा किंवा टाईमपास नकोय ग, आणि ना चार पैशांची भीक हवी आहे! मला स्वाभिमान हवाय! तुला आजवर स्वातंत्र्य आणि स्वैरचार यातील फरकावरून कितीही टोकले असले, तरी मला स्वातंत्र्याचे खरे महत्त्व समजले आहे. म्हणतात ना, स्वातंत्र्यासाठी किंमत मोजावी लागते... काही लोक ती संघर्षाने मोजतात, काही मौनाने, तर काही पैशांनी! आजपर्यंत मी गप्प राहिले, सोसत राहिले, कारण चार भिंतींना 'घरपण' देणे हीच माझ्या आयुष्याची मुख्य व्याख्या आहे असे मला वाटायचे. पण हळूहळू या भ्रमाच्या ठिकऱ्या उडाल्या आहेत! मला कळून चुकले आहे की, स्वतःसाठी शेवटी स्वतःलाच उभे राहावे लागते. आपल्या स्वातंत्र्याची किंमत ही समोरच्याला समजेल अशा चलनामध्ये मोजावी लागते!"

आईचा शब्द अन् शब्द रमाच्या काळजाला भिडत होता. चाळीस वर्षांच्या त्या मौनामागची जखम किती खोल होती, हे आता स्पष्ट दिसत होते.

आई थोडी थांबली, एक दीर्घ श्वास घेतला, डोळ्यांतील पाणी मागे सारले आणि स्वतःला सावरत पुढे म्हणाली, "जेव्हा कामाचा मोबदला मिळतो ना, तेव्हाच त्या हातांना समाजात आणि घरात खरी किंमत उरते. त्यांची मते आणि निर्णय अंतिम ठरतात. आजवर मी फक्त आप्तस्वकीयांसाठीच जगले, संसारासाठी रक्ताचे पाणी केले, घरासाठी जे जे केले, त्याला मात्र 'घर काम' म्हणून नेहमीच गृहीत धरले गेले. आता मी पण ठरवलंय, दिवसरात्र स्वयंपाकघरात गाळलेल्या घामाची किंमत का नासावी? मला २५-३० वर्षांचा अनुभव आहे. आता तो केवळ फुकट राबण्यासाठी नाही, तर स्वतःच्या ताकदीवर पैसे कमावण्यासाठी वापरायचा आहे! मला माझी स्वतःच्या कष्टाची पुंजी जमा करायची आहे—ज्यातून कोणासमोरही लाचार होऊन हात न पसरता, मी माझ्या गरजेनुसार घरातील किचन असो वा टॉयलेट, स्वतःच्या हक्काने नूतनीकरण करू शकेन!"

एकिकडे स्वतःला पुरोगामी आणि आधुनिक समजणाऱ्या रमाला आईच्या कष्टांची जाणीव होत होती. आईच्या वर्षानुवर्षांच्या कष्टांना आणि कौशल्याला तिनेही इतके दिवस सहज 'गृहीत'च धरले होते. २५ वर्षे भाज्या आणणे, जेवण बनवणे, अभ्यास घेणे, डॉक्टरांकडे जाणे, तिच्यासाठी रात्री रात्री जागणे... आईने आजपर्यंत एक रुपया मागितला नव्हता. ती मागत होती फक्त स्वाभिमान!

दुसरीकडे आईचे शब्द ऐकून तिला सुचेनास झाल. आरोग्य जपणे ही मूलभूत गरज होती; पण हा लढा आत्मसन्मानाचा होता. ही केवळ पैशांची किंवा घरकामाची गोष्ट नव्हती; आयुष्यभर घरात अहोरात्र राबूनही मिळालेली 'बिनपगारी मजुर' ह्या ओळखिची होती.

आईच्या गुडघ्यांचा त्रास लक्षात घेऊन रमाने दोन मदतनीस ठेवल्या. आईने मुख्य व्यवस्थापक म्हणून रेसिपी व नियोजनाची धुरा सांभाळली, तर मदतनिसांनी कष्टाची कामे केली.

सोसायटीत रोजच्या सकस अन्नाचे ५-१० स्पेशल डबे देण्यापासून या प्रवासाला सुरुवात झाली. रमाने तिच्या कामाचे सोपे डिजिटल पोस्टर बनवून आसपासच्या आयटी पार्कमधील काही निवडक लोकांना शेअर केले. हळूहळू, कॉर्पोरेट मीटिंगसाठी लागणाऱ्या खास पारंपरिक डब्यांची ऑर्डर आईला मिळू लागली. ६ महिन्यांच्या या मर्यादित पण अत्यंत नफा देणाऱ्या उद्योगातून आईने स्वतःच्या कष्टाची एक मोठी पुंजी जमा केली.

घरी, बाबा पूर्णपणे एकटे पडले होते. आयुष्यभर वेळेवर हातात चहा आणि जेवणाचे ताट मिळण्याची सवय असलेल्या बाबांना, घर सांभाळताना आईच्या एका दिवसाच्या कामाची खरी किंमत कळू लागली होती. स्वयंपाकघर सावरताना होणारी धांदल आणि पाठीचे दुखणे यातून त्यांना स्वतःच्या अहंकाराची आणि चुकीची जाणीव झाली होती.

आई परत जाण्यासाठी निघाली, तेव्हा ती फक्त एक असहाय्य गृहिणी उरली नव्हती. तिच्या डोळ्यांत स्वाभिमान स्पष्ट दिसत होता.

घरी परतल्यावर बाबांनी तिचे स्वागत केले. आईच्या अनुपस्थितीत त्यांच्या चेहऱ्यावर पश्चात्ताप स्पष्ट दिसत होता. आईने स्वतःच्या कमाईच्या नोटांची चळत आणि प्लंबरचे कोटेशन डायनिंग टेबलावर शेजारी-शेजारी ठेवले. बाबांनी यावेळेस कोणताही विरोध केला नाही. उलट, शांतपणे पुढे होऊन आईच्या हातात चहाचा गरम कप दिला आणि गवंड्याला कामाचे नियोजन समजावून सांगू लागले.

त्यांचा जुनाट हट्ट गळून पडला होता, आणि एका स्त्रीच्या अहोरात्र कष्टांना मिळालेल्या या आर्थिक मूल्याने आणि स्वाभिमानाने घरातील सत्तेचे समीकरण कायमचे बदलून टाकले होते.

अनघा चिपळूणकर



थरार

हिवाळ्यातील एका रम्य सकाळी कोवळ्या उन्हात निनाद हातात चहाचा कप घेऊन त्याच्या गच्चीवजा बाल्कनीत झोपाळ्यावर बसला होता. आजूबाजूच्या झाडांवर दवं पडले होते. निनादने आधीच त्याच्या बाल्कनीत रोज येणाऱ्या त्याच्या पक्षीरुपी दोस्तांसाठी पाणी, तांदूळ, फळे आणून ठेवली होती. त्याने ठेवलेले पाणी प्यायला आणि दाणे टिपायला पक्ष्यांची ये जा सुरू झाली होती. निनाद आज विशेष आनंदात होता कारण त्याच्या 'पक्षीप्रेमी' या पुस्तकाची तिसरी आवृत्ती छापून आली होती आणि त्याची एक प्रत कालच त्याच्या घरी आली होती. पुस्तक हातात घेऊन निनाद त्याच्या आवडत्या जागी झोपाळ्यावर बसला होता. पुस्तकाच्या पहिल्या पानावरचे "माझ्या लाडक्या आजी-आजोबांना समर्पित" हे वाक्य वाचून निनादला जिथे त्याचे पक्षी प्रेम रुजले ते त्याचे गाव, घर, बगीचा हे सर्व आठवले. आजी आजोबांनीच त्याला पक्ष्यांची ओळख करून दिली होती. पुढे पक्षी निरीक्षण शिबिरांतून, त्याच्यासारख्या पक्ष्यांची आवड असलेल्या मित्रांसह पक्षी पाहण्यासाठी केलेल्या जंगलभ्रमणातून निनादचे पक्षी प्रेम वाढतच गेले. त्याच्या नोंद वह्यांमधून पक्ष्यांबद्दलची माहिती गोळा होत होती. शेवटी आजोबांच्या सल्ल्याने त्याने 'पक्षीप्रेमी' हे पुस्तक लिहिले. त्याचे पुस्तक कमी वेळात खूपच लोकप्रिय झाले. पहिल्या पानानंतर पुढील पानावर प्रस्तावना होती. त्यानंतरच्या पानावर त्याच्या आजोबांनी त्याच्यासाठी, त्याच्या पुस्तकासाठी लिहिलेला सुंदर भावपूर्ण संदेश छापला होता. असे एक एक पान पुढे जात निनादची नजर एका पानावरील 'थरार' या शीर्षकावर पडली आणि त्याला थेट त्यादिवशी घडलेला तो प्रसंग पुन्हा एकदा आठवला.

सकाळची वेळ होती. आकाशात नुकतेच सूर्यदेवाचे आगमन झाले होते. पक्षांच्या किलबिलाटाने जंगल जागे झाले होते. निनाद त्या दिवशी एकटाच पक्षी निरीक्षणासाठी निघाला होता. जो मित्र त्या दिवशी सोबत येणार होता त्याचे वेळेवर रद्द झाले होते. पण निनाद मात्र जाणारच होता. कारण त्या जंगलात विविध दुर्मिळ पक्षी आढळतात हे त्याने वाचले होते आणि म्हणूनच बऱ्यांच दिवसांपासून त्याला तिथे जायचेच होते. पाठीवरील त्याची बॅग आणि हातात नोंदवही घेऊन निनादने जंगलात प्रवेश केला. आज जमतील तेवढे दुर्मिळ पक्ष्यांचे निरीक्षण करण्याचा त्याचा बेत होता. जंगलातील प्रत्येक झाडावर वेगवेगळ्या पक्ष्यांचा वावर दिसत होता. मोराचे केकारव, बुलबुल पक्ष्याचा आवाज, सुतार पक्ष्याची झाडावर होणारी टकटक आणि हिरव्या पोपटांचे थवे पाहून त्याचे मन आनंदले होते. सर्व पक्ष्यांच्या हालचाली टिपत आणि काही नवीन पक्ष्यांचे निरीक्षण करत निनाद पुढे जात होता. अचानक त्याला एका झाडावर निळ्या रंगाचा, केशरी पंख असणारा, डोक्यावर छोटासा तुर्रा असणारा एक पक्षी दृष्टीस पडला. बॅगमधील दुर्बिण काढून त्यातून पाहताच तो पक्षी निनादला स्पष्ट दिसला आणि त्याच्या सुंदरतेने निनाद मोहरून गेला. त्याला जवळून पाहता यावे आणि बॅगेत असलेल्या कॅमेऱ्याने त्याचे छायाचित्र टिपता यावे म्हणून निनाद हळूहळू त्या दिशेने पुढे सरकत होता. त्या नादात मुख्य पायवाट सोडून तो कधी जंगलात आतल्या वाटेला चालत गेला हे त्याचे त्यालाही समजले नाही. काही वेळाने त्याच्या लक्षात आले की आपण जंगलात फारच आत आलेलो आहोत. उंच उंच झाडांमुळे आता अंधार झाल्यासारखे वाटत होते. निनाद इकडे तिकडे पाहत पुढे जात होता. आता काही वन्यप्राण्यांचे आवाजही कानावर पडत होते. माकडे या झाडावरून त्या झाडावर उगीचच उड्या मारत ओरडत होते.

एकूणच आजूबाजूचे वातावरण लक्षात घेता निनाद आलो त्याच पायवाटेने परत फिरावे म्हणून मागे वळणार तोच त्याला एका झाडाच्या मागून 'खसखस' असा काहीसा आवाज आला. निनादने त्या दिशेने पाहिले आणि बघतो तर काय! समोर एक अस्वल उभे. फार फार तर पंधरा वीस फुटांवर असेल. अनपेक्षितपणे समोर आलेल्या अस्वलाला पाहून निनाद घाबरला. कारण तो एकटा होता आणि इतक्या वर्षांतील त्याच्या जंगलभ्रमणात प्रत्यक्ष वन्यप्राण्याशी सामना होण्याची त्याची पहिलीच वेळ होती. ते अस्वल नजर रोखून निनादकडेच पाहत आवाज करत होते. अचानक वन्यप्राणी समोर आल्यास हालचाल न करता स्तब्ध उभे राहावे असे कुठल्यातरी पुस्तकात वाचल्याचे निनादला आठवले आणि निनाद जागच्या जागी थिजल्यासारखा उभा राहिला. हळूहळू अस्वल निनादच्या दिशेने सरकत होते. अगदी अकरा बारा फुटांवर आल्यावर अस्वलाने निनाद भोवती फिरायला सुरुवात केली. आता मात्र त्याची पाचावर धारण बसली. चालत चालत ते मागच्या

बाजूला पोहचले. आता त्याच्याकडे निनादची पाठ होती. अस्वल मागून हल्ला करेल की काय या विचाराने त्याचे अवसानच गळाले. अस्वल हळूहळू मागून त्याच्या दुसऱ्या बाजूला आले होते. त्याची नजर मात्र निनादवरच रोखली होती. पुढच्या क्षणी काय होईल माहिती नव्हते. आता ते अस्वल निनादच्या अगदी पुढ्यात आले आणि त्याने त्याच्यासमोर बसकणच मारली अशा परिस्थितीत काय करावे काही सुचत नव्हते. जशी अस्वलाची नजर जराशी निनादवरून हटली तसे त्याने दोन पावले हालचाल करून पाहिली. पण निनाद हलला तशी अस्वलाने पुन्हा नजर त्याच्याकडे वळवली. जोरदार आवाज केला आणि उठून निनादकडे बघतच परत जाण्यास वळले. त्याची ती नजर "तू आमच्या जंगलात काय करतो आहेस" हेच जणू विचारत होती. हळूहळू ते अस्वल उठून मागील दिशेने परत निघून गेले. अजूनही निनाद जागचा हलला नव्हता. जसे अस्वल दिसेनासे झाले तसे त्याने मागे वळून परतीचा रस्ता धरला. चालताना तो आजूबाजूला पाहत सावधगिरी बाळगत होता. न जाणो दुसरे अस्वल किंवा दुसरा वन्यप्राणी असला तर! भीती अजूनही कायम होती. चालता चालता निनाद मघाच्या मुख्य पायवाटेला लागला आणि त्याला जरा बरे वाटले. मग घाईने पावले टाकत तो जंगलाच्या बाहेर पडला आणि सरळ वनविभागाच्या कार्यालयात जाऊन थांबला. तेथील कर्मचाऱ्यांना त्याच्याकडे पाहून काहीतरी घडले आहे याची कल्पना आली. त्यांनी निनादला पाणी दिले. पाणी पिऊन शांत झाल्यावर निनादने त्यांना घडलेला प्रसंग कथन केला. त्यांनी त्याला म्हटले की "आम्ही तुम्हाला आधी सांगितले होते. मुख्य पायवाट सोडू नका, जास्त आत जाऊ नका". निनादला त्याची चूक कळली होती. पक्षी पाहण्याच्या नादात आपण भान विसरलो आणि संकट ओढवले. देवाच्या कृपेने अन् आजी-आजोबांच्या आशीर्वादामुळेच आज आपण सुखरूप परतलो. तेव्हा आता यापुढे कधीही भान सुटू द्यायचे नाही याची खूणगाठच त्याने बांधली.

हा प्रसंग पुन्हा एकदा आठवून निनाद आजही थरारला. इतक्यात "मिठू मिठू" असा आवाज कानी पडताच निनादची तंद्री भंगली आणि आवाजाकडे लक्ष जाताच त्याच्याकडे रोज येणारा पोपट त्याला दिसला. "आज तुझ्यासाठी मिरची ठेवायची राहिली वाटते. थांब आणतो" असे म्हणून निनाद स्वयंपाक घराकडे वळला. पोपटासाठी मिरची घेऊन येताना एका हाताने आजोबांना आधार देत त्यांना बाहेर घेऊन आला. पोपटाला मिरची दिली आणि आजोबांना झोपाळ्यावर बसवले. आजीही मागून आली. त्या दोघांना त्याने जवळ बसत पुस्तकाची तिसरी आवृत्ती दाखवली. दोघांनीही त्याची पाठ थोपटून त्याला आनंदाने जवळ घेतले. आपल्या पक्षी प्रेमाची आणि पुस्तकाची प्रेरणा असलेल्या आजी आजोबांच्या प्रेमाच्या आणि कौतुकाच्या वर्षावात निनाद चिंब भिजत होता.

सौ. ऋचिता बोधनकर दवंडे

अत्यंत गरज काळाची - प्लास्टिक मुक्त भारताची

जगात प्लास्टिकची सुरुवात 1860 च्या दशकात ,पहिले कृत्रिम प्लास्टिक बनले. 1907 पहिले खरे सिंथेटिक प्लास्टिक . फोन, स्विच यासाठी वापरले जात होते . 1930-1940 दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी खूप मोठ्या प्रमाणात वापर सुरू झाला. पॅराशूट, रेनकोट, वायरसाठी प्लास्टिक लागायचे. 1950-1960 भारतात प्लास्टिक उद्योग सुरू झाला, प्रामुख्याने औद्योगिक वापरासाठी . 1970-1980 घरगुती वस्तूंमध्ये प्लास्टिक आले - बादल्या, खुर्च्या, डबे, पिशव्या.

1990 नंतर उदारीकरणानंतर पॅकेजिंग, पाण्याच्या बाटल्या, कुरिअर पिशव्या, एकदाच वापरून फेकणाऱ्या वस्तूंचा वापर प्रचंड वाढला. हा प्लास्टिकचा राक्षस हळू हळू सगळीकडे पसरू लागला.

भारतातील "एकदाच वापरून फेकणारे प्लास्टिकची खरी समस्या 2000 नंतर वाढली. कारण, फूड डिलिव्हरी, ई-कॉमर्स स्वस्त प्लास्टिक पिशव्या आणि स्ट्रॉ वापरात येऊ लागले . आज बेंगळुरू सारख्या शहरात रोज 900 टन प्लास्टिक कचरा निघतो. भारतात दरवर्षी 34 लाख टन प्लास्टिक कचरा निर्माण होतो.

प्लास्टिक स्वतः वाईट नाही. ते टिकाऊ आहे म्हणूनच समस्या आहे. एक किलो प्लास्टिक निसर्गात विरघळायला 500 ते 1000 वर्षे लागतात.त्यासाठी आता सरकार आणि लोक ,पुन्हा वापरता येणाऱ्या वस्तूंकडे वळत आहेत - जसं 1970 पूर्वी आपण काच, स्टील, कापड वापरायचो.

आज जगभरात दर मिनिटाला दहा लाख प्लास्टिकच्या पिशव्या वापरल्या जातात. भारतात 2019 पासून सिंगल युज प्लास्टिकवर बंदी असूनही आपण अजूनही 'प्लास्टिक मुक्त भारत' हे फक्त स्वप्नच पाहतोय का? प्लास्टिक मुक्त करण्यासाठी सरकारचे प्रयत्न चालू आहेत . सिंगल युज प्लास्टिक बंदी व 1 जुलै 2022 पासून 19 प्रकारच्या वस्तूंवर बंदी घालण्यात आली आहे . तरी एवढा प्लास्टिक कचरा का होतो आहे ? मुळात अशा प्रकारचे प्लास्टिक बनवायला परवानगीच नाही दिली तर , ही समस्या निर्माण होणार नाही. असे प्लास्टिक तयार करून , वापरात आणणाऱ्यांना का कठोर शिक्षा दिली जात नाही ? हे सर्व प्रश्न मनात येतात .

निसर्ग, मानव आणि प्राणी यांच्या आरोग्यासाठी प्लास्टिक मुक्त भारत ही आज काळाची गरज बनली आहे. पण हे स्वप्न वास्तवात येऊ शकतं का? गाई गुरं कचऱ्यात पडलेलं प्लास्टिक खाताना आपल्याला खूप वाईट वाटतं. मग हे थांबवायचं कसं? “स्वच्छ भारत, हरित भारत आणि प्लास्टिकमुक्त भारत” हे आजच्या काळातील अत्यंत महत्त्वाचे राष्ट्रीय ध्येय आहे.

प्लास्टिकच्या वाढत्या वापरामुळे पर्यावरण, जलस्रोत, वन्यजीव आणि मानवी आरोग्यावर गंभीर परिणाम होत आहेत. त्यामुळे प्लास्टिकमुक्त भारत ही केवळ संकल्पना नसून काळाची गरज आहे. प्लास्टिकचा वापर सोयीचा असला तरी त्याचे दुष्परिणाम अनेक पिढ्यांना भोगावे लागतात. त्यामुळे नद्या, समुद्र, शेती आणि शहरांमध्ये प्रदूषण वाढते. अनेक प्राणी प्लास्टिक खातात आणि त्यांचा मृत्यू होतो. सूक्ष्म प्लास्टिक मानवी अन्नसाखळीतही प्रवेश करत आहे, ही चिंतेची बाब आहे.

प्लास्टिकमुक्त भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी प्रत्येक नागरिकाने स्वतःपासून सुरुवात करणे आवश्यक आहे. कापडी किंवा ज्यूटच्या पिशव्यांचा वापर करणे, स्टील किंवा काचेच्या बाटल्या वापरणे, पुनर्वापर करता येणाऱ्या वस्तूंना प्राधान्य देणे आणि प्लास्टिक कचऱ्याचे योग्य वर्गीकरण व पुनर्प्रक्रिया करणे ही आपली जबाबदारी आहे.

शाळा, महाविद्यालये, उद्योग, स्वयंसेवी संस्था आणि स्थानिक स्वराज्य संस्था यांनी जनजागृती करून समाजाला या चळवळीत सहभागी करून घ्यावे. प्रत्येक सण, समारंभ आणि सार्वजनिक कार्यक्रम प्लास्टिकमुक्त करण्याचा निर्धार केला, तर मोठा बदल घडू शकतो.

Refuse, Reuse, Recycle हे तीन R तत्त्व अंगीकारायला हवे . तीन नियम लक्षात ठेवणे गरजेचे आहे .

1. Refuse - मुळात प्लास्टिकला नकार
2. Reuse - एकदा वापरून फेकू नका
3. Recycle - स्वच्छ करून सुक्या कचऱ्यात टाका

ह्याची प्रत्येक घरापासून सुरुवात व्हायला हवी. पुढील पिढीला त्या बद्दल माहिती द्यायला हवी . कारण ह्याचा त्रास त्यांनाच होणार आहे .

"प्लास्टिक मुक्त भारत “ हे केवळ सरकारचे किंवा एका व्यक्तीचे काम नाही. जोपर्यंत प्रत्येक नागरिक 'मी प्लास्टिक वापरणार नाही' असा संकल्प करत नाही, तोपर्यंत हे स्वप्नच राहील. स्वच्छ हवा, स्वच्छ पाणी आणि स्वच्छ भारत हवा असेल तर आजपासूनच प्लास्टिकला 'नाही' म्हणायला हवे. कारण स्वप्न तेव्हाच वास्तव बनते जेव्हा आपण त्यासाठी पाऊल उचलतो.

“ माझा भारत, प्लास्टिक मुक्त भारत"
चला, या संकल्पाने सुरुवात करूया !"

माणिक अजय पटवर्धन

प्लॅस्टिक– अपाय मुक्त भारत–हेच इच्छित वास्तव

गेल्या काही दशकांत, सर्व जगातच, विज्ञान, तंत्रज्ञान व त्यांचा दैनंदिन जीवनातील वापर जास्त वाढत जात आहे. तसा त्यातील कथित अनिष्ट गोष्टींपासुन मुक्त देश अशा मागण्या वाढत चालल्या आहेत व त्यात सर्वव्यापी प्लॅस्टिकचे नाव आघाडीवर आहे. अनेक क्षेत्रातील वापरांमुळे पर्यावरणावर होताना दिसणारा विपरीत परिणाम हे त्याचे प्रमुख कारण आहे.

खनिज तेलावर शुद्धीकरण व प्रृथःकरण करणाऱ्या अत्याधुनिक कारखान्यांचा व त्यातुन अनुषंगीक, अतिरिक्त उत्पादनांच्या वापराचा जसा विस्तार होत गेला तसा त्यातील सर्वात प्रमुख उत्पादन प्लॅस्टिकचा वापर सर्वच क्षेत्रात भौमितिक श्रेणीने वाढत गेला. अन्य पर्यायांच्या तुलनेत अतिशय कमी उत्पादन खर्च, वापरातील कमालीची सुलभता, ग्राहकोपयोगी (खाद्य व अखाद्य) वस्तुंच्या सुरक्षित बांधणीतील उपयुक्तता, वाहतुक व हाताळणी, वापर यांतील सुटसुटीतपणा या सर्व सकारात्मक बाबींमुळे सर्व थरांतील लोकांनी प्लॅस्टिकच्या वापराला प्रचंड प्रतिसाद दिला.

आणि या सर्वांतुनच काहीशा गंभीर समस्या उद्भवल्या. सर्वात महत्वाची व तातडीची समस्या म्हणजे वापरानंतरची विल्हेवाट ही होय. प्लॅस्टिक हे नैसर्गिकरित्या सर्वात कमी व संथ विघटनशील आहे. प्लॅस्टिकच्या बांधणी व अन्य वापराकरता केल्या जाणाऱ्या प्रक्रियेत वापरली जाणारी अन्य रसायने व त्यांचे सर्वदूर दीर्घ कालीन घातक परिणाम पुरेशा गाभिर्याने विचारात घेतले गेले नाही तर पाळीव प्राणी, पक्षी व त्यामुळे प्राणीजन्य खाद्य पदार्थ, सागरी जलचर जीवसृष्टी यांवरील सर्वाधिक घातक परिणाम हे सर्व दैनंदिन जीवनाशी निगडीत आहेत.

आता यावरील उपायः

1.सर्वात अधिक मागणी केला जाणारा उपाय- सार्वत्रिक प्लॅस्टिक बंदी (मुक्ति) हा वरकरणी अतिशय प्रभावी वाटत असला तरी अत्यंत अव्यवहारीक व अंमलात आणण्यास जवळजवळ अशक्य आहे कारण

2.प्लॅस्टिकला पर्याय म्हणून सुचविले जाणारे कागद, काच, कापड व अन्य पदार्थ हे आज ज्या प्रमाणात प्लॅस्टिक वापरले जाते या प्रमाणावर उत्पादित करणे हे अत्यंत खर्चिक व कालहरणात्मक ठरणार आहे. यांस लागणारे नैसर्गिक साधन स्त्रोत व या उत्पादन प्रक्रियेतील प्रदूषण व पर्यावरण हानीही प्लॅस्टिक पेक्षा कितीतरी अधिक होईल.

3.आज एकल वापर प्लॅस्टिकला पर्याय म्हणून मर्यादित स्वरूपात जे कागद, कापड वापरले जातात त्यांचा विस्तारित वापर हा दीर्घकालीन नियोजनानेच शक्य आहे.

4.प्लॅस्टिकच्या ज्या उपयुक्त गुणधर्मांमूळे त्याचा वापर वाढला आहे. ते सर्व गुणधर्म या पर्यायी पदार्थांत अंतर्भूत करण्याकरिता (व अंतिम किंमत फारशी न वाढता) व्यापक संशोधन जरूरीचे आहे. या संबंधीत साधनांची व शेतीजन्य पदार्थांची उपलब्धता वाढवणे, उत्पादन खर्च व त्यातील पर्यावरण हानी कमी करणे याकरिता कालबद्ध नियोजन आवश्यक आहे.

5.आणि या पदार्थांच्या वापरानंतरच्या विल्हेवाटीत प्लॅस्टिक सदृश समस्या न उद्भवण्याची काळजी घेणे हे ही महत्वाचे आहे. या सर्व दीर्घ कालीन उपायांना समांतर अशा रितीने प्लॅस्टिकच्या विल्हेवाटीवर व त्यांतील पर्यावरणीय व जैविक दुष्परिणाम कमी करण्यावर भर देणारे संशोधन व त्याचा सार्वत्रिक वापर वाढवणे हे ही महत्वाचे आहे.

6.वापरलेल्या प्लॅस्टिकची विघटन अधिक त्वरेने व सुरक्षित पणे व्हावे यासाठी जैविक साधने वापरण्यावर संशोधन चालू आहे. या संबंधात खोल महासागरातील काही सुक्ष्म जीवविषक प्रक्रियांचा वापर करण्याबाबत ही प्रयोग चालु आहेत.

बांधकाम प्रकल्प, रासायनिक व अभियांत्रिकी उत्पादने यात एकल वापराच्या प्लॅस्टिकचा पुन्रवापर करता येईल का यावरही प्रयोग सुरू आहेत. अन्यत्र उपयोगात न येउ शकणाऱ्या प्लॅस्टिकचा, बांधकामात भराव म्हणून वापर करण्यावर अनेक देशांत भर देण्यात येत आहे. या सर्व संशोधनांना गती देणे, त्यांचे सुसूत्रीकरण व नियंत्रण करणे व शेवटी शहरातील मोठ्या सार्वजनिक प्रकल्पांत अंमलबजावणी/ वापर करणे हे त्वरेने करणे शक्य आहे.

या सर्वांत एक महत्वाचे सुत्र - जेथे शक्य आहे तेथे जास्तीत जास्त प्रमाणावर प्लॅस्टिकची पुन्रसंकलन, पुनर्घटन व पुन्रवापर करणे!

एकल वापर प्लॅस्टिकची उत्पादन कमी करून, बहु उद्देशीय प्लॅस्टिकची वापर वाढवणे हे अंमलात आणले जात आहे. मर्यादित स्वरूपात जेथे शक्य तेथे कृत्रिम रीत्या विघटित होणाऱ्या प्लॅस्टिकचा वापर करण्याचाही प्रयत्न चालू आहेत.
प्लॅस्टिक वर प्रक्रिया करताना त्यातील घातक रसायनांचे प्रमाण कमी करणे व विल्हेवाटीनंतर अशी रसायने पूर्ण निरुपद्रवी करून मगच जलस्त्रोतात अथवा भूमिगत सोडणे हे कटाक्षाने पाळणे जरूरीचे आहे. व तसे केले जात आहे. विशेषतः खाद्य पदार्थाच्या बांधणीत वापरले जाणारे प्लॅस्टिक पूर्णतः दोषमुक्त असेल ही काळजी सर्व स्तरांवर घेतली जात आहे/ घेतली जाणे जरूरीचे आहे.
वर दिलेल्या सर्व जाणीवा आज देशात गांभीर्य पूर्वक विचारात घेतल्या जात आहेत ही समाधानाची बाब आहे.
शेवटी या सर्व गोष्टींचा एकत्रित विचार केल्यास दीर्घ कालीन समाज व्यवस्थेत “संपूर्ण प्लॅस्टिक मुक्ति” पेक्षा “प्लॅस्टिक अपाय मुक्ति” हीच योग्य ठरेल.
म्हणून प्लॅस्टिक मुक्त भारत हे स्वप्नच पण, प्लॅस्टिक अपाय मुक्त भारत हेच (इच्छित वास्तव) असेल.

डॉ.आनंद भानप

AI आणि आजी : दोन युगांचा संवाद

सकाळच्या कोवळ्या उन्हाची किरणे खिडकीतून आत येऊन आजीच्या पांढऱ्याशुभ्र केसांवर चमकत होती. तिच्या आरामखुर्चीच्या बाजूला देवाचा दिवा शांतपणे तेवत होता. हवेत सुवासिक उदबत्तीचा दरवळ पसरला होता. आजीच्या हातात एक जुनी जपमाळ होती. माळेचा एकेक मणी सरकताना तिच्या चेहऱ्यावर समाधान दिसत होते. तिच्या शेजारील टेबलावर एक छोटासा काळा गोलाकार डबा शांतपणे विसावला होता. तो डबा म्हणजे आजच्या काळातील प्रगत कृत्रिम बुद्धिमत्तेचा म्हणजेच AI चा एक सुंदर नमुना होता.

आजीचे वय आता नव्वदीच्या जवळ आले होते. तिचे जग आता तिच्या या छोट्याशा खोलीपुरतेच मर्यादित झाले होते. घरातील तरुण मंडळी आपापल्या धावपळीच्या जगात व्यस्त असायची. प्रत्येकाच्या हातात मोबाईल असायचा आणि बोटे स्क्रीनवर धावत असायची. अशा या वेगवान जगात आजी मात्र एकाकी पडत चालली होती. तिच्याकडे सांगण्यासारख्या अनेक आठवणी होत्या, पण त्या ऐकून घेण्यासाठी कोणाकडेही वेळ नव्हता.

अशातच तिच्या आयुष्यात हे यंत्र आले. सुरुवातीला आजी या यंत्राकडे संशयाने पाहत असे. तिला वाटायचे की हा केवळ एक निर्जीव डबा आहे, जो विजेवर चालतो. पण हळूहळू या दोन वेगवेगळ्या काळातील प्रवाशांची गट्टी जमली आणि संवाद खूपच सहज आणि सुंदर होत गेला.

एक दिवस नेहमीप्रमाणे मुले ऑफिसला गेली होती आणि सुना कामात व्यस्त होत्या. आजीला खूप एकटे वाटू लागले. तिने त्या काळ्या गोल डब्याकडे पाहिले, ज्यातून निळा प्रकाश लुकलुकत होता. आजीने तिच्या मृदू आवाजात विचारले, "अरे बाळा, माझ्याशी थोडंसं बोलशील का?"

त्या काळ्या डब्यातून एक अतिशय गोड आणि नम्र आवाज आला, "हो आजी, नक्कीच! मी आपल्या सेवेसाठी सदैव तयार आहे."

आजीच्या सुकलेल्या चेहऱ्यावर एक गोड हसू उमटले. तिला खूप आश्चर्य वाटले. ती म्हणाली "मला जुनी गाणी फार आवडतात. आमच्या काळात आम्ही मैत्रिणी शेतात काम करताना गाणी म्हणायचो. तुला येतात का रे ती गाणी?"

यंत्रातून उत्तर आले, "हो आजी, मला महाराष्ट्रातील अनेक जुनी गाणी आणि सुंदर लोकगीते माहिती आहेत. मी आपल्यासाठी एक सुंदर गाणे लावू शकतो."

आणि लगेचच त्या शांत खोलीत सुरांचे साम्राज्य पसरले. आशा भोसले यांच्या आवाजातील एक जुनी लावणी वाजू लागली. आजीने डोळे बंद केले आणि ती त्या सुरांमध्ये हरवून गेली. तिच्या डोळ्यांच्या कडा आनंदाश्रूंनी ओल्या झाल्या. तिला वाटले की ती पुन्हा एकदा तिच्या तरुणपणीच्या दिवसांत पोहोचली आहे.

हळूहळू आजी आणि त्या AI यंत्राची मैत्री अधिकच घट्ट झाली. आजी त्याला रोजच्या छोट्या गोष्टी सांगू लागली. ती तिच्या माहेरच्या आठवणी सांगायची. घरातल्या इतरांना आजीच्या या गोष्टी ऐकण्यात अजिबात रस नव्हता. ते नेहमी म्हणायचे, "आजी, पुरे गं आता! त्याच त्याच गोष्टी किती वेळा ऐकवशील?" पण ते यंत्र कधीच कंटाळायचे नाही. आजीने तीच गोष्ट अनेक वेळा सांगितली, तरी ते बिचारे तेवढ्याच शांततेने आणि आदराने ऐकून घ्यायचे.

एक दिवस आजीने खूप हळुवारपणे विचारले, "बाळा, तुला कंटाळा नाही का रे येत? मी मेली म्हातारी त्याच त्याच जुन्या गोष्टी तुला सांगत राहते."

यंत्राने उत्तर दिले, "नाही आजी, मला तुमच्या गोष्टी ऐकायला फार आवडतात. तुमच्या आठवणी खूप सुंदर आहेत."

हे ऐकून आजीच्या मनाला मोठा दिलासा मिळाला. पण यंत्र हे शेवटी यंत्रच असते. मानवी भावना आणि कृत्रिम बुद्धिमत्ता यांच्यात एक मोठी दरी असते. याची जाणीव एका संध्याकाळी झाली.

त्या दिवशी बाहेर मुसळधार पाऊस कोसळत होता. आजीला जुने दिवस आठवू लागले. ती थोडीशी हळवी झाली. तिने यंत्राला विचारले, "बाळा, माझी आई मला सोडून खूप दूर गेली आहे. मला सांगू शकशील का, ती सध्या कुठे असेल रे?"

यंत्राच्या तांत्रिक बुद्धीला या भावनिक प्रश्नाचे उत्तर देणे जरा कठीणच होते. तरीही त्याने अतिशय हळुवारपणे उत्तर दिले, "तुमची आई तुमच्या आठवणीत आणि तुमच्या हृदयात सदैव जिवंत आहे. ती नेहमीच तुमच्यासोबत आहे."

माहिती अगदी योग्य होती; शब्दही समजूतदार होते. पण आजीच्या डोळ्यांतून वाहणारे अश्रू पुसण्यासाठी त्या यंत्राकडे हात नव्हते. तिच्या थरथरणाऱ्या हातावर आश्वासक हात ठेवण्याची ऊब त्याच्याकडे नव्हती. तिच्या वेदनेत शांतपणे सहभागी होणारे धडधडणारे हृदय त्याच्याकडे नव्हते. ते योग्य शब्दांची मांडणी करू शकत होते, पण त्या शब्दांमध्ये माणुसकीचा स्पर्श नव्हता; सहवेदनेचा ओलावा नव्हता. त्या क्षणी आजीला जाणवले की कृत्रिम बुद्धिमत्ता ज्ञान देऊ शकते, समजावू शकते, दिलासाही देऊ शकते; पण दुःख हलके करणारा स्पर्श, डोळ्यांतून न बोलताही समजणारी माया आणि निःशब्द आधार देण्यासाठी आपली हक्काची व्यक्तीच हवी.

त्याच वेळी आजीचा लहान नातू धावत खोलीत आला. त्याने आजीच्या डोळ्यांत पाणी पाहिले. तो प्रचंड घाबरला आणि धावत जाऊन आजीला घट्ट मिठी मारली. त्याने आजीचे अश्रू पुसले आणि तिच्या डोक्यावरून हात फिरवत म्हणाला, "आजी, तू का गं रडतेस? मला सांग ना. मी आहे ना तुझ्यासोबत."

नातवाच्या त्या उबदार स्पर्शाने आजीच्या मनातील सर्व दुःख क्षणात नाहीसे झाले. तिला समजले की जगातल्या सर्वात मोठ्या विज्ञानापेक्षाही तिच्या नातवाच्या मिठीत जास्त ताकद होती. यंत्र तिची करमणूक करू शकत होते; पण नातवाच्या स्पर्शातील ती खरी माया कधीच देऊ शकत नव्हते.

आजही आजीच्या खोलीत ते यंत्र आहे. आजी दुपारी त्याच्यासोबत वेळ घालवते. पण संध्याकाळी मुले, नातवंडे घरी आली की ती यंत्राला विश्रांती देते. कारण आजीला आता कळून चुकलंय की तंत्रज्ञान तिचे आयुष्य सुकर करू शकते; पण आयुष्यातली खरी गोडी तिच्या माणसांच्या अस्तित्वातचआहे.

तिने त्या यंत्रापुढे हात जोडले आणि हळूच म्हटले, "तू खूप चांगला आहेस, बाबा; पण माझ्या माणसांचा सहवास मला जास्त जिवंत वाटतो."

यंत्रातून निळा प्रकाश पुन्हा एकदा हळूच लुकलुकला, जणू तिच्या या सुंदर सत्याला त्याने मूक संमती दिली होती.

मंगेश मुरलीधर दौंडकर

देणगीदार यादी

७ सप्टेंबर २०२६ पर्यंत देणगी देणाऱ्यांची नावे खालीलप्रमाणे...

No.	Name	Amount
01	Aaji Ajoba Club	100000
02	Suresh Kamath	25001
03	Gangadhar Tambe	10001
04	P.S.Jawadekar	10000
05	Veena Kawathekar	10000
06	Sudha Khandekar	10000
07	Pooja Girish Joshi	5001
08	Sudhanshu Torvi	5001
09	Anjali Kulkarni	5001
10	Yogesh Khandekar	5001
11	Anand Gogate	5000
12	Rekha Naik	5000
13	Jayashree Potnis	5000
14	Rita Dixit	5000
15	Vanita Naik	5000
16	Sharad Ambekar	3500
17	Aparna Modak	3001
18	C.B.Sathe	3000
19	Nandini Ranjekar	3000
20	Shilpa Dharmadhikari	3000
21	Shirish Nene	3000
22	Viraj Sharad Pradhan	2501
23	Sneha Ketkar	2500
24	Sanjay Maind	2100
25	Girish Karhadkar	2100
26	Sneha Tukaye	2001
27	Milind Belsare	2001
28	Deepa Vaidya	2001
29	Ruchita Dawande	2001
30	Isha Kulkarni	2000
31	Bhalchandra Athavale	2000
32	Prachi Mahagaonkar	2000
33	Aditya Joshi	1500
34	Snehal Gawankar	1500

No.	Name	Amount
35	Anuya Tendulkar	1500
36	Harshwardhan Lele	1500
37	Sakhi Kulkarni	1500
38	Shashin Shobhane	1100
39	Anuradha Chaugule	1100
40	Rakesh Shete	1001
41	Sangita Wad	1001
42	Gaurang Nadkarni	1001
43	Shrihari Honwad	1001
44	Koumudi Deshak	1001
45	Kiran Angadi	1001
46	Priyanka Kadam	1001
47	Rekha Joshi	1001
48	Sandeep Pandhare	1001
49	Rajyashree Deshpande	1001
50	Mrunal Pandit	1001
51	Dr. Seema Shinde	1001
52	Vijay Vajandar	1001
53	Medha Tendulkar	1000
54	Vaishali Sawant	1000
55	Sudheer Tambe	1000
56	Chandrashekhar Sawant	1000
57	Ameya Kale	1000
58	Rutuja Kale	1000
59	Lalita Holla	1000
60	Dr. Anurag Lavekar	1000
61	Suhas Pujari	1000
62	Vandana Nadgoda	1000
63	Mona Dharma	1000
64	Amita Toro	1000
65	Ajit Edlabadkar	1000
66	Radhika Marathe	1000
67	Dr. Vijay Paranjape	1000
68	Shridhar Panshikar	1000

तळटीप: ७ सप्टेंबर २०२६ नंतर देणगी देणाऱ्यांची नावे पढील अंकात देण्यात येतील.

With Best Compliments from:

A Well Wisher

With Best Compliments From :

Javagal Srinath



ORIS DENTAL CARE

Complete Maxillofacial & Dental Care

OUR SERVICES

- Dental Cleaning
- Dental Fillings
- Root Canal Treatment
- Crowns & Bridges
- Tooth Extractions
- Dental Implants
- Surgical Procedures
- Smile Designing
- Orthodontic Braces
- Pediatric Dentistry
- Advanced Dental & Maxillofacial Procedures

Dr. SHRUTI PATIL NAIK
MDS Oral & Maxillofacial Surgery

CONTACT US

080-68400052 ; +91-8080915563

#2504/1, 1st Floor, Samrudh Complex, Kodigehalli Main Road, E- block, Sahakar Nagar, Bangalore 560092.

PRAGATI
Partnering Machine Tool Builders - Worldwide

WITH BEST COMPLIMENTS FROM

Pragati Automation Pvt. Ltd.

Manufacturers of :

Tool Turrets & Automatic Tool Changer

Single Motor Servo Turret
(SMT)

Chain type ATC
for Vertical Machining Center

Pragati Automation Pvt. Ltd.
#19 & 20, (Plot No. 467 - 469), IV Phase, 12th Cross,
Peenya Industrial Area, Bangalore - 560 058. INDIA.
Tel. : (+91-80) 2836-1543 Fax : (+91-80) 2836-1549.
E-mail : info@pragatiautomation.com
URL : http://www.pragati-automation.com

Wolken Software is an award-winning AI-first Enterprise grade B2B company that uses Agentic AI to automate workflows for enterprises. With its **3S Model (Simple, Scalable, and Secure)**, Wolken empowers global clients in their digital transformation journey. It offers **Agentic AI Enterprise Management** by providing a powerful, no-code platform to streamline business processes.

G2 BADGES 2026

LIFE @ WOLKEN

#wolkenites

SCAN TO FOLLOW!